अहवाल क्रमांक : १८१

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

भंडारा जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# दुसरा अहवाल

(सदर अहवाल दिनांक        मार्च, २०२१ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस
सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२१

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

भंडारा जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# दुसरा अहवाल

# पंचायती राज समिती
## (सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास बाळासाहेब पाटील (घाडगे), वि.स.स.

(४) डॉ. राहूल वेदप्रकाश पाटील, वि.स.स.

(५) श्री. अनिल भाईदास पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम अरूणकाका जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव शंकरराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर गोविंदराव निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव निवृत्तीराव जवळगावकर, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा सुरेश धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरीभाऊ किसनराव बागडे, वि.स.स.

(१३) डॉ. विजयकुमार कृष्णराव गावीत, वि.स.स.

(१४) डॉ. देवराव मादगुजी होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्ण धमाजी गजबे, वि.स.स.

(१६) डॉ. संजय श्रीराम कुटे, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंसीलाल बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना दिपक बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर गजानन जोरगेवार, वि.स.स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.

(२४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेंद्र भागवत, सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी.

## पंचायती राज समिती

**(सन २०१७-२०१८)**

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) ***रिक्त

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) ***रिक्त

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) *श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) **श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(५) श्री. नितेश भालेराव, कक्ष अधिकारी.

*श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निंमत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

**श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

***श्री. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| १ | १ | भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबीसंदर्भात | १ |
| २ | २ | प्राथमिक आरोग्य केंद्र, पहेला पंचायत समिती | ४ |
| ३ | ३ | महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत कपाट पुरविण्यास झालेला विलंब | ६ |
| ४ | ४ | पंचायत समिती भंडारा अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना | ९ |
| ५ | ५ | जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून भूमीहीन लोकांना भूखंड मिळणेबाबत | १३ |
| ६ | ६ | राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम राबविणेबाबत | १६ |

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा " समिती प्रमुख " या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा दुसरा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परिक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा. सभापती, विधानपरिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडी आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासून प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला " Mini Legislature " सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्यांने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तरी ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्त्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वक्षेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्त्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषांगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरूरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतर दुस-या माहिती विचारण्याची पद्धत जोपसली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयातील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधीत नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधाणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा स असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्द्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीने स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोस्ताहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेट देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेट देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोस्ताहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने भंडारा जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने भंडारा जिल्हा परिषदेस दिनांक १, २ व ३ ऑगस्ट, २०१८ रोजी भेट देऊन श्री. रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ११ जून २०१९ रोजी जिल्हा परिषद, भंडारा संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्ष घेतली.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामाविकास विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती विनिता सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्रीमती सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. संतोषकुमार, व्य.सं.म.ल.ङ. महामंडळ, श्री. म. र. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. कि. शां. परब, उप सचिव, जलसंपदा विभाग, डॉ. विजय बुंदेवार, सह संचालक, आरोग्य सेवा, श्री. राजाराम माने, विभागीय आयुक्त, नाशिक, श्री. यु. श्रीरंगम, सचिव तथा मु.का.अ. महा इमारत व इतर बांधकाम मुंबई, श्री. विजयकांत पानबुडे, अप्पर कामगार आयुक्त, नागपूर, श्री. पुंडलिक मिराशे, सह सचिव (तांत्रिक) म.प्र.न. मंडळ, श्री. विजयकुमार कलवले, सहायक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, श्री. श. मा. साठे, उप सचिव, कामगार विभाग, डॉ. प्रशांत उईके, जिल्हा आरोग्य अधिकारी, श्री. रमेश चव्हाण, उप सचिव, महसुल विभाग, श्री. रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. अ. बा. मानकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, श्री. एल. एस. पाच्छापुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या भंडारा जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्द्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक ३ मार्च २०२१ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरूस्तींसह संमत केला

| | |
|---|---|
| **विधान भवन,** | **संजय रायमुलकर,** |
| मुंबई, | समिती प्रमुख, |
| दिनांक : ३ मार्च २०२१. | पंचायती राज समिती. |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, भंडारा (प्रशासन)

### भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबीसंदर्भात

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत भंडारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे व अनौपचारिक चर्चेदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, भंडारा जिल्ह्यामध्ये आरोग्याचेही अनेक प्रश्न आहेत. नागपूर येथील नाग नदीमधील दूषित सांडपाणी भंडारा जिल्ह्यातील अनेक नद्यांमध्ये सोडण्यात येत असते. त्यामुळे शासनाने नाग नदीमधील दूषित पाण्याची विल्हेवाट लावावी. या दूषित पाण्यामुळे भंडारा जिल्ह्यातील ५० गावे बाधित झालेली आहेत.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

नागपूर शहरातून वाहत जाणा-या नाग नदी मधील दूषित सांडपाणी भंडारा जिल्ह्यातील अनेक नद्यांमध्ये सोडण्यात येत असल्यामुळे या दूषित पाण्यामुळे भंडारा जिल्ह्यातील ५० गावे बाधित झाल्याप्रकरणी पर्यावरण विभागाने कोणती तातडीची उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे.

**उपरोक्त मुदयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

नाग नदीच्या दूषित पाण्यामुळे भंडारा जिल्ह्यातील एकूण ४५ गावे बाधित झाली आहेत. सदर ४५ गावांपैकी ३० गांवामध्ये जलशुद्धीकरण यंत्र (RO PLANT) खालील योजनेमधून ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद भंडाराकडून लावण्यात आले आहेत.

(१) LWE योजनेअंतर्गत-१२ गावांमध्ये १२ RO Plant

(२) नागरी सुविधेअंतर्गत १६ गावांमध्ये १६ RO Plant

(३) ग्रामपंचायत १४ वित्त आयोग २ गावांमध्ये २ RO Plant व उर्वरीत १५ गावांमध्ये नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत, खनिज प्रतिष्ठान निधी, व आमदार विकास निधीमधून जलशुद्धीकरण यंत्र लावण्याचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. सद्यस्थितीत या गावांमध्ये ब्लिचींग पावडरद्वारे नियमित शुद्धीकरण करून पाणी पुरवठा सुरू आहे. उपरोक्तप्रमाणे जिल्हा परिषद भंडाराकडून उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पर्यावरण विभागाचे अभिप्राय :- नाग नदीबाबतचा संक्षिप्त अहवाल:-** नागपूर कार्यक्षेत्रातून नाग, पिवळी,कन्हान इत्यादी नद्या वाहतात. पिली नदीचे पाणी भारतवाडा येथे मिळत असून पुढे कन्हान नदी, वैनगंगा नदीला आंभोरा येथे मिळते.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीतून निर्माण होणारे घरगुती सांडपाणी प्रक्रियाकृत वा विनाप्रक्रियाकृत नाग नदीत मिसळणे व नागरी घनकचरा नदी पात्रामध्ये टाकणे ही नाग नदीच्या प्रदूषणाची मुख्य कारणे आहेत.

नागपूर शहरातून निर्माण होणा-या एकूण ५२० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाण्यापैकी २०० द.ल. लि. प्रतिदिन सांडपाणी प्रक्रिया करून नाग नदीमध्ये सोडण्यात येते व १३० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाणी प्रक्रिया करून मे.कोराडी थर्मल पॉवर स्टेशनला पुरविण्यात येते. तसेच मोक्षधाम व मानकापूर येथील ५ द.ल.लि. लघू सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे काम पूर्ण झालेले आहे. सद्यस्थितीत मानकापूर येथील प्रक्रियाकृत घरगुती सांडपाणी पिली नदीमध्ये सोडण्यात येते व मोक्षधाम येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये प्रक्रियाकृत ५ द.ल.लि. नाग नदीमध्ये सोडण्यात येते. उरलेले १८० द.ल.लि. सांडपाणी प्रतिदिन प्रक्रिया न करता थेट वा नाल्याव्दारे नाग नदीत सोडले जाते.

नाग व पिवळी नदीच्या किना-यावर असणा-या स्थानिक स्वराज्य व नागपूर शहरातून निर्माण होणारे घरगुती स्वरुपाचे अप्रक्रियाकृत सांडपाणी नाग व पिवळी नदीमध्ये सोडण्यात येत असल्यामुळे नाग नदीच्या पाण्याची गुणवत्ता काही प्रमाणात खालावलेली आहे.

भंडारा जिल्ह्यात गोसेखुर्द धरण हे वैनगंगा नदीवर पवनी तालुक्यात आहे. या धरणाआधी अंदाजे १५ ते २० कि.मी.वरच्या भागाला आंभोरा येथे कन्हान नदी वैनगंगा नदीस मिळते. त्यापुर्वी कन्हान नदीच्या वरच्या भागाला आगरगांव येथे नागपूर शहरातून येणारी नाग नदी कन्हान नदीस मिळते. नाग नदी नागपूर शहराचे सांडपाणी मोठ्या प्रमाणात वाहून नेते व पुढे ते कन्हान नदीमार्फत वैनगंगा नदीस मिळते.

गोसेखुर्द धरणामुळे वैनगंगा नदीचा प्रवाह अडविण्यात आला आहे. नाग नदीचा हा दूषित प्रवाह वैनगंगा नदीत मिसळत असल्याने गोसेखुर्द धरणातील पाण्याची गुणवत्ता खालावत असल्याचे दिसून येत आहे.

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात आलेली कार्यवाही:-**

उपरोक्त अनुपालनाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नागपूर महानगरपालिकेविरुद्ध जल ( प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३ अ, व हवा ( प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम ३१ अ, व नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २०००, अंतर्गत वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २१ जुलै, २०१६, १० ऑक्टोबर २०१६, ०७ एप्रिल २०१८ व २५ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्देश दिले आहेत.

नागपूर महानगरपालिकेतर्फे National River Conservation प्रकल्पांतर्गत रू.१२५२.३३ कोटी रकमेचा प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण मंत्रालयात पाठविण्यात आला होता. त्यानुसार सदर प्रस्तावास राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाने दिनांक ०२ नोव्हेंबर ०१६ रोजी तत्वतः मान्यता दिली असून त्यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा ६०% (७५१.३९ कोटी), राज्य शासन हिस्सा २५% (३१८.०८ कोटी) व नागपूर महानगरपालिका हिस्सा १५% (१८७.८४ कोटी) असणार आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या हिश्श्याबाबत राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता करण्याची कार्यवाही पर्यावरण विभागामार्फत सुरू आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने भंडारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ जून २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींच्या संदर्भात नागपूर शहरातील वाहत जाणा-या नाग नदीतील दूषित सांडपाणी भंडारा जिल्ह्यातील अनेक नद्यांमध्ये सोडण्यात येत असल्यामुळे या दूषित पाण्यामुळे भंडारा जिल्ह्यातील ५० गावे बाधित झाल्याप्रकरणी पर्यावरण विभागाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे अशी समितीने विचारणा केली असता उप सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विशद केले की, भंडारा जिल्ह्यातील काही गावांमध्ये प्रदूषण होत आहे. नागपूर महानगरपालिकेने नाग नदी स्वच्छ करण्यासाठी सन २०१६ मध्ये १२५२ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाला केंद्र शासनाने तत्वतः मान्यता सुद्धा दिली होती. त्यावेळी निधीच्या संदर्भात ८५ टक्के केंद्र शासन आणि १५ टक्के राज्य शासन म्हणजे नागपूर महानगरपालिकेचा हिस्सा होता. त्यानंतर सन २०१७ मध्ये निधीच्या संदर्भात केंद्र शासनाने धोरण बदलून त्यात ६०:४० टक्के प्रमाण (रेशो) निश्चित केले. याकरिता विभागाला नियोजन विभागाची पुन्हा मान्यता घ्यावी लागली. सदर रेशोमध्ये ६० टक्के केंद्र शासन, २५ टक्के राज्य शासन आणि १५ टक्के महानगरपालिका असा निधीचा हिस्सा होता. त्याकरिता उच्चस्तरीय समितीची मागील आठवडयात मान्यता घेण्यात आली. आता त्यासंबंधी प्रस्ताव तयार करून माननीय मुख्यमंत्र्यांकडून त्याला मान्यता घेतली जाईल. त्यानंतर सदर कामासाठी निधी प्राप्त होईल. यावर समितीने विचारणा केली की, लेखी उत्तरात काही गावांमध्ये आरओ प्लांट लावण्यात आले आहेत त्याबद्दल पर्यावरण विभागाचे काय मत आहे, यावर उप सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विशद केले की, सदर आरओ प्लांट जिल्हा परिषदेने तात्पुरती व्यवस्था म्हणून लावलेले आहेत.

समितीने विचारणा केली की, त्यावर आता हरकत (ऑबजेक्शन) घेतली जात आहे. एक लिटर पाणी शुद्ध करण्यासाठी किती लिटर पाणी वाया जात आहे. यावर प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विशद केले की, साधारणतः एक लिटर पाणी शुद्ध करण्यासाठी ३० टक्के पाणी वाया जाऊ शकते.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, एक लिटर पाणी शुद्ध करण्यासाठी वाया जाणा-या पाण्याचे प्रमाण जास्त आहे. पाणी शुद्ध करण्यासाठी कमीत कमी पाणी वाया जाईल याकरिता नवीन तंत्रज्ञान (टेक्नॉलॉजी) निर्माण केले आहे. त्या तंत्रज्ञानाचा (टेक्नॉलॉजीचा) वापर करणे आवश्यक आहे. याचे कारण असे आहे की, पाणी टंचाई मोठया प्रमाणात असून अद्याप त्यावर आपण मात करू शकलो नाही. तसेच गोसीखुर्दचे पाणी शुद्ध करण्यासाठी आरओ प्लांट ही कायमस्वरुपी व्यवस्था नाही. यावर प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विशद केले की, सन २००८ मध्ये ते नागपूर आयुक्त होते. तेव्हा पासून नाग नदीच्या संदर्भात कार्यवाही सुरू आहे. आता त्याकरिता १२०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे ही अतिशय आनंदाची बाब आहे.

समितीने निदेश दिले की, मागील वेळी धांडेवाडीला पाणी शुद्ध करण्यासाठी प्लांट सुरू करण्यात आला होता. त्यातून आपण कोराडीला पाणी देत आहोत. तसेच केंद्र शासनाने दुस-या प्लांटच्या संदर्भात निधी मंजूर केलेला आहे. त्यानंतर सांडपाणी प्रक्रिया (सिव्हेज ट्रिटमेंट) केल्यानंतर पाणी दूषित होऊ शकणार नाही.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १ ऑगस्ट ते ३ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत भंडारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता, जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीने जिल्ह्यातील विधीमंडळ सदस्य आणि जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसमवेत अनौपचारिक चर्चा केली. या चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, भंडारा जिल्ह्यामध्ये आरोग्यविषयक अनेक समस्या असल्याचे दिसून आले. विशेषतः नागपूर येथील नाग नदीमधील दूषित सांडपाणी भंडारा जिल्ह्यातील अनेक नद्यांमध्ये सोडण्यात येते. त्यामुळे पर्यावरण विभागाने नाग नदीमधील दूषित पाण्यावर योग्यरित्या प्रक्रिया करून नदी मध्ये होणारे जल प्रदूषण थांबविणे अत्यंत आवश्यक आहे कारण या दूषित पाण्यामुळे भंडारा जिल्ह्यातील ४५ गांवे बाधित झालेली आहेत, ही बाब अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. सदर ४५ गावांपैकी ३० गावांमध्ये जलशुद्धीकरण यंत्रे (आरओ प्लांट) जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून बसविण्यात आलेली असली तरी उर्वरित १५ गावामध्ये जल शुद्धीकरण यंत्रे अद्याप बसविण्यात आलेली नाहीत. सध्या या गावांमध्ये ब्लिचिंग पावडरद्वारे शुद्धीकरण करून पाणीपुरवठा करण्यात येत असल्याचे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहिती वरून दिसून येते त्यामुळे समिती या प्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

नागपूर शहरातून निर्माण होणा-या एकूण ५२० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाण्यापैकी केवळ २०० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाणी प्रक्रिया करून नाग नदीमध्ये सोडण्यात येते व १३० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाणी प्रक्रिया करून मे.कोराडी थर्मल पॉवर स्टेशनला पुरविण्यात येते. सद्यःस्थितीत १८० द.ल.लि. सांडपाणी प्रतिदिन प्रक्रिया न करता थेट वा नाल्याद्वारे नाग नदीत सोडले जाते. तसेच नाग नदीचा हा दूषित प्रवाह वैनगंगा नदीत मिसळत असल्याने गोसेखुर्द धरणातील पाण्याची गुणवत्ता खालावत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आणखी गंभीर समस्या निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार नागपूर महानगर पालिकेतर्फे राष्ट्रीय नदी संवर्धन (National River Conservation) प्रकल्पांतर्गत रूपये १२५२.३३ कोटी रकमेचा प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण मंत्रालयात पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाने दिनांक २ नोव्हेंबर,२०१६ रोजी तत्वतः मान्यता दिली असून त्यामध्ये केंद्र शासन, राज्य शासन व नागपूर महापालिकेचा हिस्सा अनुक्रमे ६०%, २५% व १५% इतका आहे. तथापि या प्रकरणी पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे दिसून येते **त्यामुळे याप्रकरणी राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाने उपस्थित केलेल्या मुद्दयांची पूर्तता पर्यावरण विभागाने लवकरात लवकर करून सदर प्रकल्प त्वरित कार्यान्वित होण्यासाठी संबंधितांची जबाबदारी निश्चित करून या प्रकल्पाची कालमर्यादा ठरवून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यांच्या आत अवगत करण्यात यावी, तसेच भंडारा जिल्ह्यातील उर्वरित १५ गावांमध्ये करण्यात येणारा पाणीपुरवठा जल शुद्धीकरण यंत्रामार्फत करण्याच्या दृष्टीने उपरोक्त गावांमध्ये कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण दोन

# जिल्हा परिषद, भंडारा (प्रशासन)

## प्राथमिक आरोग्य केंद्र, पहेला पंचायत समिती

पंचायती राज समितीने दिनांक २ ऑगस्ट, २०१८ रोजी भंडारा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, पहेला येथे भेट दिली असता, भंडारा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, पहेला येथील वैद्यकीय अधिकारी यांनी समितीस पुढीलप्रमाणे विदित केले की, सदर ठिकाणी कुटुंबकल्याण शस्त्रक्रियेचे रुग्ण जास्त प्रमाणात असतात, तसेच दररोज सरासरी १०० रुग्ण बाहयरुग्ण विभागामध्ये तपासणीसाठी येतात. यावर समितीने बाहयरुग्ण विभागामध्ये रुग्ण फार कमी येत असल्याबाबत विचारणा केली असता, वैद्यकिय अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, प्राथमिक आरोग्य केंद्रातंर्गत फक्त ३२,८८२ लोकसंख्या आहे तसेच बाहयरुग्ण विभागाचे पैसे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या खात्यामध्ये भरले जातात.

तद्नंतर समितीच्या असे निदर्शनास आले की, ऑपरेशन थिएटरच्या बाहेरच्या कक्षातील बेसिनच्या खालील भागाला व्हाईट वॉश केला नसल्याचे आढळून आले. तालुका आरोग्य अधिका-यांनी सदर कामाच्या देयकावर सही केली आहे, मात्र काम योग्यरितीने झाले नसल्यामुळे सदर कामाच्या संदर्भात समितीने नाराजी व्यक्त केली असता, वैद्यकीय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत ५० वर्षे जुनी असून स्लॅबची २ वेळा दुरुस्ती केली आहे, कोबा १० वर्षे जुना आहे, मात्र इमारतीच्या निर्लेखनाला मंजुरी मिळालेली असल्यामुळे २ वर्षांत कोणतेही बांधकाम न झाल्याचे आणि आताही कोणतीही दुरुस्ती करण्यात आलेली नाही. यावर सदर इमारत सुस्थितीत असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता, इमारत निर्लेखित केल्यानंतर बाजूला असलेल्या जागेवर तात्पुरती व्यवस्था करण्यात येणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत बांधण्याबाबत आरोग्य विभागाला पत्र पाठविण्यात आले असून तत्संदर्भातील पाठपुरावा सुरू आहे. तसेच सदर ठिकाणी कुटुंबकल्याण शस्त्रक्रियेचे रुग्ण जास्त प्रमाणात असल्याबाबत, मागच्या ३ महिन्यांत मागणी करूनही औषधे न मिळाल्याबाबत वैद्यकीय अधिका-यांनी सांगितले. यावर समितीने मत व्यक्त करून निदेश दिले की, कदाचित औषधे परस्पर विकली जात असल्यामुळे ३ महिन्यांत मागणी करूनही प्राथमिक आरोग्य केंद्राला औषधे मिळाली नाहीत, ३ महिने औषधांचा तुटवडा होता, औषधांचा पुरवठा करण्याची जबाबदारी तालुका आरोग्य अधिका-यांची आहे, सदर विषयाच्या संदर्भात विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात यावी. तद्नंतर समितीने वैद्यकीय अधिका-यांना आरकेएसच्या संदर्भात विचारणा केली असता आरकेएसमधून मिळणारा नियतव्यय एक लाख रुपये असून सदरचा निधी ३ टप्प्यांत मिळतो, आरकेएसमधून मिळणारा निधी औषधांसाठी असतो, मात्र त्यातून आरकेएसचे लेखे तपासण्याकरिता प्राथमिक आरोग्य केंद्राच्याच लिपिकाला रुपये १५००/- देण्यात येतात असे वैद्यकीय अधिकारी यांनी समितीस विदित केले. यावर सदर बाबतीत समितीने आक्षेप घेत सदर काम असलेल्या पगारातूनच केले पाहिजे, आरकेएस ही योजना केंद्र सरकारची असून आरकेएसमधील पैसे रुग्णांच्या औषधांसाठीच वापरण्यात आले पाहिजेत असे मत समितीने व्यक्त केले असता, यावर वैद्यकीय अधिकारी यांनी समितीला विशद केले की, राज्य स्तरावरील लिपिक वर्गाने एकत्रितपणे सदर काम न करण्याबाबत ठरविले आहे. सदर बाबतीत मानधन देण्याबाबत अगोदर परिपत्रक काढण्यात आले होते, मात्र नव्याने काढण्यात आलेल्या परिपत्रकानुसार मानधन न देता असलेल्या पगारातच सदरचे काम करावे. यावर समितीने निदेश दिले की, सदर बाब देखील विभागाच्या सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात यावी.

तद्नंतर समितीने पाहणी करून विचारणा केली असता असे समजले की, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या क्षेत्रात "डॉक्टर आपल्या गावी" या योजनेचे वेळापत्रक नाही, परिणामी सदर योजना राबविण्यात येत नाही. समितीने प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भेट पुस्तिकेची पाहणी केली असता गट विकास अधिका-यांनी सदर प्राथमिक आरोग्य केंद्राला एकदाही भेट दिली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. राष्ट्रीय आरोग्य मिशन योजनेंतर्गत ठरवून दिलेल्या कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉक्टरांनी गावात गेले पाहिजे, सब सेंटरला बसले पाहिजे असा नियम असतानाही तसे झाले नसल्याचे समितीच्या लक्षात आले. याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्राबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, भंडारा अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, पहेला याठिकाणी ३ महिन्यांत मागणी करूनही प्राथमिक आरोग्य केंद्राला औषध पुरवठा न करण्याची कारणे काय आहेत, या प्रकरणी चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, असल्यास त्यानुसार संबंधिताविरुद्ध पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती, भंडारा अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, पहेला या ठिकाणी ३ महिन्यांत मागणी करूनही प्राथमिक आरोग्य केंद्राला औषध पुरवठा न करण्याबाबत चौकशी करण्यात आली. पंचायती राज समितीच्या भेटीपूर्वी ३ महिने म्हणजे १ एपिल २०१८ ते ३१ जुलै २०१८

या कालावधीत प्राथमिक आरोग्य केंद्र पहेला यांचेकडून तेरा वेळा औषधी मागणी केल्यानुसार औषध पुरवठा करण्यात आला होता. औषधी साठा नोंदवहीनुसार कुटुंब कल्याण शस्त्रक्रीयेसाठी लागणारे व इतर आजारांची औषधे उपलब्ध होती व सदर कालावधीमध्ये रुग्णसेवा सुरळीत सुरू होती.

सदर प्रकरणी औषधे उपलब्ध असल्याचे आढळल्याने जबाबदारी निश्चित करून कारवाई केलेली नाही. तथापि, सदर माहितीच्या अनुषंगाने श्री. मिथुन डोंगरे वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र पहेला यांना पत्र क्र. ३१९/१९, दि. १९ जानेवारी २०१९ अन्वये खुलासा मागविण्यात आलेला आहे. सबब अनुपालन अहवाल मान्यतेस्तव सादर.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय.

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्रायः-** विभाग सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने भंडारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुदयावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ जून २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पंचायत समिती, भंडारा अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, पहेला येथे मागणी करूनही तीन महिने औषध पुरवठा न करण्याची कारणे काय आहे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, औषधे उपलब्ध होती. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १९ जानेवारी २०१९ रोजी कारणे दाखवा नोटीस दिली. त्याला त्यांनी खुलासा देखील केला. आता याबाबत आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून आयुक्त आरोग्य यांच्याकडे प्रस्ताव आलेला आहे. याचे कारण असे की, ती माहिती चुकीची होती. तेथे प्रत्यक्षात औषधे उपलब्ध होती.

तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, औषधे उपलब्ध होती. पंचायती राज समितीच्या जिल्हा बैठकीमध्ये उत्तर देताना संबंधित कर्मचारी घाबरून गेला होता व त्यांच्याकडून चुकीची माहिती सांगितली गेली. परंतु औषधे उपलब्ध होती व वेळोवेळी औषधांची मागणी झाली त्यानुसार, औषधांचे वाटप केलेले आहेत.

### अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने जिल्हा परिषद, भंडारा येथे दिनांक १ ऑगस्ट ते ३ ऑगस्ट २०१८ या कालावधीत भेट दिली असता, भंडारा तालुक्यातील पहेला येथील प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी समितीच्या असे निदर्शनास आले की, या आरोग्य केंद्रातर्गत ३२,८८२ इतकी लोकसंख्या असताना बाहयरुग्ण विभागामध्ये (ओपीडी मध्ये) दररोज सरासरी फक्त १०० रुग्ण तपासणीसाठी येतात. तसेच सदर आरोग्य केंद्रातील कामाच्या देयकावर तालुका आरोग्य अधिका-यांनी स्वाक्षरी केलेली आहे. तथापि, सदर कामे योग्यरितीने झालेली नाहीत. सदर आरोग्य केंद्राच्या इमारतीला ५० वर्ष पूर्ण झालेली असून इमारतीच्या निर्लेखनाला मंजुरी मिळाली असल्यामुळे २ वर्षात कोणतेही बांधकाम करण्यात आलेले नसून कोणतीही इमारत दुरुस्ती करण्यात आल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे ही बाब समितीस अनाकलनीय व असमर्थनीय वाटते. सदर आरोग्य केंद्रामध्ये कुटूंब कल्याण शस्त्रक्रियेसाठी जास्त प्रमाणात रुग्ण येतात. तथापि, माहे मे, २०१८ पासून आरोग्य केंद्राने मागणी करूनही औषधे प्राप्त झालेली नाहीत. त्यामुळे ३ महिन्यांपासून औषधाचा तुटवडा असल्याचे दिसून आले ही बाब असमाधानकारक आहे. औषधे पुरवठा प्रकरणी जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार समितीच्या भूतपूर्वी ३ महिने म्हणजे दिनांक १ एप्रिल,२०१८ ते ३१ जुलै,२०१८ या कालावधीत प्राथमिक आरोग्य केंद्र पहेला यांचेकडून तेरा वेळा औषधे मागणी केल्यानुसार औषध पुरवठा करण्यात आला होता. औषध साठा नोंदवही नुसार कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेसाठी लागणारे व इतर आजारांची औषधे उपलब्ध होती व सदर कालावधी मध्ये रुग्ण सेवा सुरळीत सुरू होती व औषधे उपलब्ध असताना देखील संबंधित कर्मचा-याने समितीला उत्तर देतेवेळी अनावधानाने चुकीची माहिती दिली असे विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान समितीस विदीत केले असले तरी मागणीनुसार औषध पुरवठा न केल्याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १९ जानेवारी २०१९ रोजी वैद्यकीय अधिकारी यांचे विरुद्ध कारणे दाखवा नोटीस बजावून त्याबाबतचा खुलासा मागविण्यात आला आहे. त्यावर वैद्यकीय अधिका-यांनी खुलासा केला आहे यावरून असे दिसून येते की, **सदर आरोग्य केंद्रास औषध पुरवठा करण्यात आला होता किंवा कसे याबाबत संदिग्धता निर्माण होते, त्यामुळे यासंदर्भात जिल्हा परिषदेने जिल्ह्यातील सर्व आरोग्य केंद्राना मागणीनुसार पुरवठा करण्यात येतो किंवा कसे याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्र व उप केंद्राबाबतची सखोल माहिती घेऊन औषध पुरवठा सुरळीत होत असल्याची खातरजमा करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच पहेला प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत लवकरात लवकर निर्लेखित करून नवीन इमारत बांधण्याबाबत सत्वर कार्यवाही करावी व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण तीन

# जिल्हा परिषद, भंडारा (प्रशासन)

**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत कपाट पुरविण्यास झालेला विलंब पंचायत समिती, पवनी**

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत भंडारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, महिला बचतगट/मंडळांना कपाट पुरविण्याबाबत माहिती देण्यात यावी. कपाट पुरविण्याचे आदेश कोणामार्फत देण्यात आले होते. यावर गट विकास अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, पुरवठादाराने माल विहित वेळेत पुरवठा केला नाही. त्यामुळे पुढील वर्षामध्ये मालाचा पुरवठा करण्यात आलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, कपाट पुरविण्याचे आदेश केव्हा दिले होते. सहाय्यक लेखा अधिकारी यांनी याबाबतची माहिती घेतली होती काय, यावर गट विकास अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत कपाट पुरवावयाचे होते. त्याबाबत दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४ रोजी पत्र देण्यात आलेले होते. यासाठी दिनांक २५ मार्च २०१४ पर्यंतची मुदत देण्यात आलेली होती. पुढे समितीने विचारणा केली की, कपाटाची किंमत किती होती यावर गट विकास अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, एक लाख वीस हजार रुपये कपाटांची किंमत होती. यावर समितीने विचारणा केली की, यासाठी दहा टक्क्यांची तरतूद (प्रोव्हिजन) करण्यात आलेली होती काय. तसेच यासाठीच्या लेखाशीर्षावर (हेडवर) किती तरतूद (प्रोव्हिजन) करण्यात आलेली होती. यावर गट विकास अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, एक लाख वीस हजार रुपये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाला देण्यात आलेले होते.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, कपाट पुरविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे निविदा (टेंडर) काढण्यात आलेली नव्हती. त्याचप्रमाणे एका कपाटाची किंमत किती होती, हे देखील अभिप्रायामध्ये दर्शविण्यात आलेले नाही. यावर गट विकास अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, आठ हजार पाचशे रुपये एका कपाटाची किंमत होती. याबाबत समितीने निदेश दिले की, दिनांक २५ मार्च पर्यंत कपाटांचा पुरवठा करावयास हवा होता. तो का करण्यात आलेला नाही. कपाटे पुरविण्याचा आदेश दिला असतानाही महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने कपाटांचा पुरवठा केलेला नाही. याबाबत गट विकास अधिकारी यांनी कारवाई करावयास हवी होती. त्याचप्रमाणे त्यांनी याबाबत त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांना कळवावयास हवे होते. असे असतांना त्यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. तसेच, विहित कालावधीमध्ये कपाटांचा पुरवठा महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने न केल्यामुळे त्यांच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती पवनी अंतर्गत महिला बचतगट/मंडळाना महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत कपाट पुरवठा करण्याचे आदेश दिलेले असतांनाही विहित कालावधीत कपाट पुरवठा न करण्याची कारणे काय आहेत.

**उपरोक्त मुदयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळामार्फत महिला बचतगट/ मंडळांना कपाट पुरविणे, ही योजना पंचायत समिती पवनी यांनी राबविली असून महिला व बालकल्याण विभागाशी संबंधित नाही. त्यामुळे सदर मुद्यामधून महिला व बालविकास विभागाचे नाव वगळण्यात यावे.

२. पंचायत समिती पवनी अंतर्गत महिला बचतगट/ मंडळांकरिता पंचायत समिती पवनी येथे ३० कपाटे पुरवठा करण्याचे आदेश महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाला आदेश क्र. पसप/६२२०/२०१४, दिनांक. २१ फेब्रुवारी, २०१४ अन्वये देण्यात आले होते. सदर ३० कपाट पंचायत समिती पवनीचे कार्यालयामध्ये दि. २५ मार्च, २०१४ पर्यंत पुरवठा करण्याचे आदेश होते. परंतु सदर दिनांकापर्यंत पंचायत समिती पवनीला कपाटांचा पुरवठा झालेला नाही. दिलेल्या पुरवठा आदेशाच्या अटीशर्तीमध्ये पुरवठा न केल्यास कार्यवाही करण्याबाबतची कोणतीही अट नमुद नसल्यामुळे तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ भंडारा यांचेवर पत्र देऊन उचित कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

सदर अखर्चित राहिलेला निधी सन २०१४-२०१५ मध्ये पुन:श्च त्याच शिर्षकाअंतर्गत कपाट खरेदी योजनेवर तरतूद करून खर्च करण्यात आला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय.

**(१) महिला व बालविकास विभागाचे अभिप्रायः-** जिल्हा परिषद, भंडारा यांचे अनुक्रमांक १ चे अभिप्रायाशी सहमत आहे.

**(२) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे अभिप्रायः-** खंड विकास अधिकारी पंचायत समिती पवनी, जिल्हा भंडारा यांनी त्यांचे आदेश क्र. पंसप/६२२०/२०१४, दिनांक २१ फेब्रुवारी २०१४ यांनी शाखा कार्यालय भंडारा यांना स्टील अलमारी साईज : १२७०mm x ७६५mm x ४४०mm एकूण ३० नग पुरवठा करण्याचे आदेश दिले होते. सदरचे आदेश हे शाखा कार्यालय, भंडारा यांना दि. ०३ मार्च २०१४ रोजी प्राप्त झाले. खंड विकास अधिकारी पंचायत समिती यांनी दिलेल्या आदेशामध्ये अट क्र. ५ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले होते.

**" स्टील अलमारी (कपाट) दिनांक २५ मार्च, २०१४ पर्यंत पुरवठा करण्यात यावा अन्यथा सदर दिनांकापर्यंत पुरवठा न झाल्यास आदेश आपोआप रद्द होईल ".**

महामंडळास सदर आदेश हे शासनाने सन २०१३-१४ या वर्षाकरिता स्टील फर्निचरच्या पुरवठ्यासाठी मंजूर केलेल्या दरकरारातील दर रु ३९४० प्रती नग याप्रमाणे देण्यात आले होते. सदर करारातील अटी व शर्तीनुसार फर्निचरचा पुरवठा करण्याकरिता कमीतकमी ३० दिवसांचा कालावधी देणे आवश्यक होते. परंतु पंचायत समिती, पवनी यांनी दिलेल्या आदेशामध्ये त्यांच्या आदेशाच्या तारखेपासून कालावधी हा २४ दिवसांचाच देण्यात आला होता.

सदर आदेश महामंडळास दि. ०३ मार्च २०१४ रोजी प्राप्त झाल्यानंतर दि. ०६ मार्च २०१४ रोजी महामंडळाने मे. डिलाईट इंडस्ट्रीज, भंडारा यांच्या नावाने पुरवठा आदेश क्र. ४३८३, दि. ०६ मार्च, २०१४ रोजी निर्गमित केले. पंचायत समिती, पवनी यांच्या आदेशात दि. २५ मार्च, २०१४ पर्यंत पुरवठा न झाल्यास आदेश आपोआप रद्द होतील अशी अट होती व ही अट दरकरारातील कमीत कमी ३० दिवसांच्या अटीशी विसंगत असल्यामुळे सदर कपाटांचा पुरवठा महामंडळामार्फत करण्यात आलेला नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने भंडारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुदयावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ जून,२०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत कपाट पुरविण्यास झालेला विलंबाबाबत (पंचायत समिती, पवनी) विचारणा केली असता, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, पंचायत समिती, पवनी यांनी दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४ रोजी लघु उद्योग विकास महामंडळाला कपाटाची ऑर्डर दिली (प्लेस केली) होती. परंतु ऑर्डर दिनांक ०३ मार्च, २०१४ रोजी मिळाली. दिनांक २५ मार्च, २०१४ पर्यंत ऑर्डर पोहोचली पाहिजे, अन्यथा ऑर्डर आपोआप रद्द होईल, अशी तरतूद होती. दिनांक ०३ मार्च, २०१४ रोजी महामंडळाकडे ऑर्डर पोहोचली आणि आम्ही दिनांक ०६ मार्च, २०१४ रोजी ऑर्डर प्लेस केली. दिनांक ०६ मार्च, २०१४ पासून दिनांक २५ मार्च, २०१४ पर्यंतचा कालावधी कमी होता. यामध्ये रेट कॉन्ट्रक्टमध्ये ५० हजार रूपयांपेक्षा कमी व्हॅल्युएशन असेल तर किमान मुदत ३० दिवस होती आणि ५० हजार रूपयांपेक्षा जास्त व्हॅल्युएशन असेल तर ९० दिवसांची मुदत होती. यामध्ये देण्यात आलेला कालावधी कमी असल्यामुळे हे रद्द करण्यात आले व ऑर्डर सप्लाय केली नाही.

समितीने विचारणा केली की, याचाच अर्थ कमी वेळ असल्यामुळे पुरवठा होऊ शकला नाही, असे समितीचे म्हणणे आहे. यावर प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी समितीस होकारात्मक सहमती दर्शविली.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, पंचायत समिती, पवनी अंतर्गत महिला बचत गट/ मंडळांना महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत कपाट पुरवठा करण्याचे दिनांक ३ मार्च, २०१८ रोजी आदेश दिलेले असतानाही विहित कालावधीत म्हणजेच दिनांक २५ मार्च, २०१४ पर्यंत कपाट पुरवठा करण्यात आला नाही. कपाट खरेदीसाठी एक लाख वीस हजार रुपये महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाला देण्यात आलेले होते. कपाट खरेदी न केल्याप्रकरणी तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी कारवाई करणे अभिप्रेत असतांना कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार कपाट पुरवठा आदेशाच्या अटी शर्तीमध्ये पुरवठा न केल्यास कार्यवाही करण्याबाबतची कोणतीही अट नमूद नसल्यामुळे तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, भंडारा यांचेवर पत्र देऊन उचित कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर अखर्चित राहिलेला निधी सन २०१४-२०१५ मध्ये पुनश्चः त्या शीर्षाकाअंतर्गत कपाट खरेदी योजनेवर तरतुद करून खर्च करण्यात आला आहे. तथापि, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी दिलेल्या

आदेशामधील अट क्रमांक ५ नुसार “स्टील अलमारी (कपाट) दिनांक २५ मार्च, २०१४ रोजी पर्यंत पुरवठा करण्यात यावा, अन्यथा सदर दिनांकापर्यंत पुरवठा न झाल्यास आदेश आपोआप रद्द होईल” असे नमूद करण्यात आलेले होते. तसेच कपाट पुरविण्याचे पुरवठा आदेश महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळास दिनांक ३ मार्च, २०१४ रोजी प्राप्त झाल्यावर दिनांक ६ मार्च, २०१४ रोजी महामंडळाने मे. डिलाईट इंडस्ट्रिज, भंडारा यांच्या नावाने पुरवठा आदेश निर्गमित केले. पंचायत समिती, पवनी यांच्या आदेशात दिनांक २५ मार्च, २०१४ रोजी पर्यंत पुरवठा न झाल्यास आदेश आपोआप रद्द होतील अशी अट हाती व ही अट दरकरारातील कमीत कमी ३० दिवसांच्या अटीशी विसंगत असल्यामुळे सदर कपाटांचा पुरवठा महामंडळामार्फत करण्यात आला नाही हे कारण समितीला संयुक्तिक वाटत नाही. **पंचायत समिती पवनी यांनी दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४ रोजी लघु उद्योग विकास महामंडळाला पुरवठा आदेश दिले होते, परंतु महामंडळाला सदर आदेश दिनांक ३ मार्च,२०१४ रोजी मिळाले यामध्ये दर करारानुसार ५० हजार रुपयांपेक्षा कमी मूल्यांकन असेल तर किमान मुदत ३० दिवस होती आणि ५० हजार रुपयांपेक्षा जास्त मूल्याकंन असेल तर ९० दिवसांची मुदत होती, त्यामुळे देण्यात आलेला कालावधी कमी असल्यामुळे आदेशानुसार पुरवठा केला नाही. यावरून असे दिसून येते की, कपाट पुरवठा करण्याबाबत अटी व शर्तीचे अवलोकन न करता संबंधितांनी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाला पुरवठा आदेश दिल्याचे दिसून येते, त्यामुळे समिती असमाधान व्यक्त करीत आहे व यापुढे जिल्हा परिषदेने व पंचायत समितीने पुरवठा आदेश निर्गमित करतांना कालमर्यादा मुल्यांक इत्यादी तांत्रिक बाबी तपासून कार्यवाही करावी. याबाबत ग्राम विकास विभागाने सर्व संबंधितांना सविस्तर परिपत्रक निर्गमित करावे व त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण चार

# जिल्हा परिषद, भंडारा (प्रशासन)

### पंचायत समिती भंडारा अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत भंडारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, सन २०१३-१४ या वर्षात पंचायत समितीमध्ये एकात्मिक बाल विकास योजनेचे ० ते ६ वयोगटातील बालके, स्तनदा माता आणि गरोदर महिलांचे किती लाभार्थी होते, त्यापैकी प्रकल्पनिहाय वर नमूद केलेल्या लाभार्थ्यांपैकी गंभीर स्वरुपाचे आजार असलेल्या लाभार्थ्यांची संख्या किती, कुपोषित लाभार्थ्यांची संख्या किती होती व त्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे का, आरोग्य तपासणी केलेल्या लाभार्थ्यांपैकी गंभीर स्वरुपाचे आजार असलेल्या लाभार्थ्यांची संख्या किती तसेच कुपोषित लाभार्थ्यांची संख्या किती आहे, त्यापैकी किती लाभार्थ्यांना संदर्भ सेवा देण्यात आली, संदर्भ सेवा न दिलेले लाभार्थी किती आहेत व त्याची कारणे काय आहेत, जिल्हा परिषदेने याबाबत कृती आराखडा तयार केला आहे काय व त्याचा पाठपुरावा केला आहे काय. तीव्र कुपोषित बालके किती होती व सन २०१८-२०१९ मध्ये तीव्र कुपोषित बालके किती आहेत. यावर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी समितीस विशद केले की, तीव्र कुपोषित बालके १५० होती व तीव्र कुपोषित बालके २११ आहेत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, गरोदर मातांना आहार दिला जातो, स्तनदा मातांना आहार दिला जातो, बालक अंगणवाडीत असताना आहार दिला जातो, बालक शाळेत असताना आहार दिला जातो, मात्र तरी देखील तीव्र कुपोषित बालकांची संख्या का वाढत आहे. पुरक पोषण आहार (टी.एच.आर.) योग्य नसतो किंवा त्यांच्यापर्यंत तो पोहचत नाही असा त्याचा अर्थ होत आहे. प्रयोगशाळा अहवाल (लॅब रिपोर्ट) आहे का यावर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी समितीस विशद केले की, ६ हजार लाभार्थ्यांना आहार पुरवठा करतो. यावर समितीने विचारणा केली की, २११ लाभार्थी कमी वजनाची आहेत, त्यांना लोहयुक्त (आयर्न) पुरक पोषण आहार (टी.एच.आर.) गोळ्या देता का, यावर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी समितीस विशद केले की, टीएचआर हा पूरक आहार आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, समितीला सातारा जिल्हा असा आढळला की, फक्त तेथे ४ मुले अति कमी वजनाची होती. भंडारा जिल्ह्यातील हे दोन्ही तालुके मागास विकास मिशनमध्ये वर आहेत. मात्र तरीही येथे ही परिस्थिती आहे. कुपोषित बालकांची संख्या कमी होत होती, लगेच तिपटीने वाढलेली आहे. यावर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी समितीस विशद केले की, व्हीसीडीसीकडून तपासणी केली आहे. जूनअखेर आढळलेली ही बालके आहेत. लाभार्थी कुपोषित राहू नयेत यासाठी आरोग्य विभागाच्या सहकार्याने आढावा (ड्राईव्ह) हाती घेतला आहे. यावर समितीने विचारणा केली की, आपले म्हणणे बरोबर आहे, ती संख्या कमी झाली पाहिजे होती, मात्र ती वाढत आहे. आपण दर महिन्याला तेवढीच मागणी करीत आहात, मात्र संख्या का वाढत आहे, महिन्याचे पुरक पोषण आहाराचे (टी.एच.आर.चे) देयक किती होते. यावर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी समितीस विशद केले की, १३ लाख रुपये होते. या मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, म्हणजे वर्षाला १५६ लाख रुपयांचा खर्च होतो. शालेय पोषण आहाराचे महिन्याचे देयक किती आहे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, तालुक्याचे वर्षाला १ कोटी २७ लाख रुपये देयक आहे. पुढे बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनीही समितीस विशद केले की, २११ पैकी १५१ मुले तीव्र कुपोषित (सॅम)मध्ये आहेत, १०१ मुलांना मागच्या महिन्यापासून व्हीसीडीसी देत आहोत, त्यांना विशेष आहार देत आहोत.

तद्नंतर समितीने संबंधितांना पुढील प्रमाणे निदेश दिले की, पुरक पोषण आहाराचे (टीएचआरचे) एका महिन्याचे जवळपास १२-१३ लाख रुपयांचे देयक आहे. सन २०१३-१४ मध्ये अतिकुपोषित मुले १०० होती, सन २०१७-१८ मध्ये त्यांची संख्या २११ झाली आहे. अर्थ स्पष्ट आहे की, प्रत्येक महिन्याला १२-१३ लाख रुपयांचा खर्च पुरक पोषण आहारावर (टी.एच.आर.) होत असताना, गरोदर माता, स्तनदा माता आणि एक ते सहा वर्षांपर्यंतची मुले यांना पुरक पोषण आहार योग्य दर्जाचा दिला जात नाही. हे सिद्ध होत आहे. त्यामुळे या संदर्भात महिला व बालविकास विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल. संबंधितांनी दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर व सी.डी.पी.ओ. यांच्यावर कारवाई करण्यात यावी. खाजगी अनुदानित शाळांची तपासणी होते का, भंडारा तालुक्यात किती खाजगी अनुदानित शाळा आहेत. यावर अधिक्षक, शालेय पोषण अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, भंडारा तालुक्यात ७१ खाजगी अनुदानित शाळा आहेत. यावर समितीने विचारणा केली की, खाजगी अनुदानित शाळांना किती भेटी दिल्या. यावर प्रभारी गट शिक्षणाधिकारी यांनी समितीस विशद केले की, सन २०१७-१८ मध्ये ३६ शाळांना भेटी दिल्या आहेत, सन २०१८-१९ मध्ये १५ शाळांना भेटी दिल्या आहेत, सन २०१८-१९ मध्ये २ शाळांना भेटी दिल्या आहेत. पुढे अधीक्षक, शालेय पोषण आहार यांनी समितीस विशद केले की, भंडारा तालुक्यातील एकाही खाजगी अनुदानित शाळेला भेट दिलेली नाही. यावर समितीने विचारणा केली की, विषय गंभीर आहे. जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक ऐकतात, मात्र खाजगी अनुदानित शाळेचे मुख्याध्यापक ऐकत नाहीत. खाजगी अनुदानित शाळांची शालेय पोषण आहाराची देयके अदा करण्यात येतात काय यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विशद केले की, होय असे होकारात्मक उत्तर दिले.

समितीने विचारणा केली की, शालेय पोषण आहार हा एक व्यवसाय झाला आहे. शालेय पोषण आहार योग्य दर्जाचा आहे का, मुले खातात का याची एकदा काही ठिकाणी तपासणी झालीच पाहिजे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विशद केले की, यापुढे काळजी घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

गरोदर माता, स्तनदा माता आणि एक ते सहा वर्षापर्यंतची मुले यांना पुरक पोषण आहाराचा योग्य दर्जाचा दिला जात नसल्याप्रकरणी प्रत्येक महिन्याला एका अंगणवाडीला देण्यात येणा-या पुरक पोषण आहार देयकाचा खर्च १२ ते १३ लाख रुपये एवढा होत असल्याप्रकरणी महिला व बालविकास विभागाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

एकात्मिक बालविकास सेवा योजना (पंचायत समिती, भंडारा) ची सखोल चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये प्रकल्पातंर्गत एकूण २०३ अंगणवाडी केंद्रे कार्यरत आहेत. कार्यरत अंगणवाडी केंद्राचे कार्यक्षेत्रात गरोदर माता, स्तनदा माता आणि ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना टिएचआर पुरवठा करण्यात येतो. सदर पुरविण्यात आलेल्या आहाराची अंगणवाडी स्तरावर पुरवठा होण्यापूर्वी व पुरवठा झाल्यानंतर प्रयोगशाळेमार्फत तपासणी करण्यात येते. सदर तपासणी केलेला आहार खाण्यायोग्य असल्याबाबत तपासणी अहवाल प्राप्त असून विभागांनी ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे आहे. अंगणवाडी स्तरावर ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांसाठी पुरवठा झाल्यानंतर गरम ताजा आहाराची तपासणी स्थानिक स्तरावरील माता समितीच्या सदस्यांमार्फत करण्यात येते. प्रकल्पांतर्गत अंगणवाडी केंद्रात वाटप करण्यात येणा-या पुरक पोषण आहार देयकाचा खर्च प्रत्येक महिन्याला शासन निर्णयानुसार योग्य आहे, त्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चीत करण्यात आलेली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय.**

**महिला व बालविकास विभागाचे अभिप्रायः-** जिल्हा परिषद, भंडारा यांचे अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने भंडारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ जून,२०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी एकात्मिक बालविकास सेवा योजना (पंचायत समिती, भंडारा) याबाबत प्रधान सचिव,महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, एका अंगणवाडीमध्ये शालेय पोषण आहाराचे एका महिनाभराचे देयक, बारा ते तेरा लाख रुपये देण्यात येत आहे आणि हा मुद्दा समितीला दौ-यावर गंभीर वाटला होता. हा ज्या तालुक्याचा प्रश्न आहे त्या तालुक्यात २०३ अंगणवाड्या आहेत. १२ ते १३ लाख रुपयांचे देयक हे केवळ एका अंगणवाड्यांचे नसून पूर्ण तालुक्यातील २०३ अंगणवाड्यांचे होते. म्हणून तो आकडा फार जास्त नाही. दुसरा विषय पुरक पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबतचा होता. पुरक पोषण आहारावर काय काय प्रक्रिया करतात आणि गुणवत्तेची कशी खात्री करतात, याबाबत एक संशय निर्माण झाला होता. यासंदर्भात जिल्हा परिषद स्तरावर पुरवठा करण्यापूर्वी त्याची विक्री चाचणी अहवाल सादर केला जातो आणि नमुना प्राप्त केल्यानंतर जिल्हा परिषद त्याची प्रयोग शाळा चाचणी करते. यावर समितीने विचारणा केली की, या पुरक पोषण आहाराचा आऊट पुट निघत नाही, असा समितीचा आक्षेप होता. आपण पूर्ण प्रक्रिया सांगत आहात. समितीचा आक्षेप असा आहे की, एखाद्या तालुक्यामध्ये कमी वजनाचे बालक दिसत असतील, अति कमी वजनाचे बालक दिसत असतील तर पुरक पोषण आहाराचा काय उपयोग आहे. कुपोषणावर मात करण्यासाठी बालक कूपोषित होऊ नये म्हणून आई गर्भवती असल्यापासून आपण पुरक पोषण आहार देतो. प्रसुती झाल्यानंतर बाळाच्या आईला पुरक पोषण आहार दिला जातो आणि बाळाला काही महिन्यानंतर देण्यात येतो. अशाही परिस्थितीमध्ये आपण प्रत्येक पंचायत समितीचा आढावा घेतला तर अति कमी वजनाची बालके दिसत आहेत. गर्भवती मातेला पुरक पोषण आहार (टी.एच.आर.) मिळत नसेल किंवा ती खात नाही. असे समितीच्या निदर्शनास आढळून आले. समितीने एका प्राथमिक आरोग्य केंद्राला भेटी दिली असता तेथे बाळंतीणीला समितीने विचारले की, तुम्ही पुरक पोषण आहार (टी.एच.आर.) खाल्ला आहे का. ती इतकी कुपोषित होती की, पुरक पोषण आहार खाल्ला का तर तिला पुरक पोषण आहार काय आहे हेच माहित नव्हते. याचा अर्थ असा आहे की, तिने बाळ पोटामध्ये असतांना पुरक पोषण आहार खाल्लाच नाही. पुरक पोषण आहार बाळ सुदृढ होण्यासाठी आईला चांगला पोषक आहार मिळावा यासाठी देण्यात येतो. महाराष्ट्रामध्ये कमी वजनाची बालके किती व अति कमी वजनाची बालके किती. ही संख्या जर वाढत चालली तर पुरक पोषण आहाराचा उपयोग होणार नाही. पुरक पोषण आहाराकरीता जर बारा, तेरा लाख रुपये एका तालुक्यात महिन्याचे खर्च करीत आहोत ते काय कामाचे आहे. यावर

प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, वाशिम जिल्हा परिषदेची साक्ष होती तेव्हा समितीने हा विषय अभ्यास करायला दिला होता. किती महिलांनी गर्भवती असताना पुरक पोषण आहार खाल्ला. त्यापैकी किती बालके कमी वजनाची जन्माला आली. बालकांना जो सुरूवातीपासून पुरक पोषण आहार दिला आहे त्या बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण कमी आहे, यासंदर्भात वाशिम जिल्हा परिषदेला सूचना दिली होती. परंतु वाशिमचा अहवाल समोर नाही. यावर समितीने संबधितांना विदित केले की, महाराष्ट्रामध्ये सर्व जिल्हा परिषदेमध्ये ही स्थिती आहे. त्याचा आढावा घेवून त्याचा सविस्तर वृत्तांत समितीला कळवावा असे सांगितले होते या बाबीला चार ते पाच महिने होऊन गेले. तद्नंतर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषद स्तरावर माहितीचे पृथःकरण (डेटा ॲनालिसिस) करायचे होते त्याचे पुढे काय झाले. यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, महाराष्ट्रात एप्रिल पासून पुरक पोषण आहार पुरवठा पूर्णपणे बंद केलेला आहे. त्याची पर्यायी व्यवस्था म्हणून कच्चे धान्य देण्याचे प्रावधान तरतूद केलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने निविदा रद्द केलेली असून नवीन निविदा काढण्याबाबत मूलभूत सूचना केलेल्या आहेत. या अनुषंगाने एप्रिल मध्ये पुरक पोषण आहाराचा पुरवठा पूर्ण महाराष्ट्रात बंद केलेला आहे. आज रोजी त्यांना जागेवर कच्चे धान्य दिले जाते.

समितीने विचारणा केली की, सर्वोच्च न्यायालयाने काय म्हटले आहे. यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, पुरक पोषण आहाराची जी निविदा आहे, त्यामध्ये अटी व शर्ती आहेत. त्यावर आक्षेप घेतला आणि ती निविदा रद्द करून ग्रामपंचायत स्तरावर धान्य देण्याबाबत सुचविले आहे. त्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने तीन आदेश दिलेले आहेत. सध्याचे निविदा रद्द करण्याचे आदेश दिले होते. दुसरे म्हणजे पर्यायी व्यवस्था करावी. तिसरे म्हणजे पुन्हा निविदा काढून ते काम ग्रामपंचायत स्तरावरील प्रतिनिधींना द्यावेत. ग्रामपंचायत स्तरावर पूरक पोषण आहार कारखाना लावण्यात यावा असे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत.

समितीने विचारणा केली की, आपण या तीनपैकी काय केले आहे. यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, जुन्या निविदाचे जे काम होते ते पूर्णपणे रद्द केलेले आहे. पर्यायी व्यवस्था म्हणून पूरक पोषण आहाराचा कोण पुरवठा करेल याबाबत विभागाकडे कोणतीही यंत्रणा उभी नसल्यामुळे जुने निविदा बंद करायची होती म्हणून कच्चे धान्य देण्याची तरतूद (प्रावधान) केलेले आहे. यावर समितीने विचारणा केली की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात कच्चे धान्य देण्याबाबत आदेश दिले आहेत का, यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये पर्यायी व्यवस्था करा इतकेच सांगितलेले आहे. तिसरे म्हणजे नवीन निविदा म्हणजे ग्रामपंचायत स्तरावर निविदा काढण्याबाबत सूचना केलेली आहे. निविदा पूर्ण होईपर्यंत ही पूर्णपणे तात्पुरती व्यवस्था आहे. आता नवीन टेंडर निघत आहे. ही पर्यायी व्यवस्था पाच ते सहा महिन्यापर्यंत राहणार आहे. कच्चा आहार देण्याचे प्रमाण माहे मे, २०१८ पासून देण्याचे सुरू केलेले आहे. एप्रिलचा निर्णय होता आणि जिल्हा परिषदेने दहा दिवसात ही पर्यायी व्यवस्था सुरू केली. तेव्हा जिल्हा परिषदेकडे २० दिवसांचा आहार शिल्लक होता. दिनांक १ मे, २०१९ पासून कच्चा आहार देण्याची तरतूद (प्रावधान) सुरू झालेले आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, पूरक पोषण आहार आपण स्तनदा मातेला खाऊ घालतो. सुदृढ बालक झाले पाहिजे म्हणून पौष्टिक आहार त्यांनी घेतला पाहिजे. याचा अर्थ माता व्यवस्थित असली पाहिजे आणि बाळ सुद्धा सुदृढ असायला पाहिजे. यासंदर्भातील विषय होता. त्यांना पौष्टीक आहार मिळण्यासंदर्भात आपण काही विचार केलेला आहे का, यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, आपण तात्पुरत्या व्यवस्थेमध्ये जे धान्य देतो त्यामध्ये गहु, तांदूळ, तेल, मीठ, आणि हळद हे सर्व देत आहोत. त्यामध्ये त्यांनी हे सर्व करून घरी खायचे आहे. आपण इंधनाचा ५० पैशाचा निधी कपात करीत होतो तो सुद्धा धान्याच्या स्वरुपात त्यांनाच देत आहोत. समितीने विचारणा केली की, आपण त्यांना कच्चा आहार देत आहोत, परंतु ते घरी शिजवून खातील कशावरुन. यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, त्यांनी स्वतः खाल्ला पाहिजे. समितीने विचारणा केली की, त्यासाठी आपण काही त्यांच्या भेटी ठेवल्या आहेत का यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, पुरवठ्यावर अंकुश ठेवण्यासाठी प्रावधान केलेले आहे. अंगणवाडी सेविकेची भेट देणे आवश्यक आहे. प्रत्येकाच्या घरी जाऊन ती व्यक्ती तो आहार खात आहे किंवा नाही ही यंत्रणा आपल्याकडे नाही.

इतक्या वर्षापासून पूरक पोषण आहाराचा पुरवठा करतो, परंतु कमी वजनाची बालके असल्याचे रेकॉर्डवर आहे ते कमी वजनाचे कसे. अति कमी वजनाची जी बालके आहेत, त्याला वेगवेगळी कारणे असू शकतात. कमी वयामध्ये लग्न होणे, मेडिकल वगैरे. आपण त्यांना आरोग्याच्या दृष्टीने सुविधा देतो. गर्भामध्ये बाळ असतानापासून सर्व पाहतो आहोत. यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, आपण आहार, मेडिकल उपचार हे सर्व करण्याचा प्रयत्न करीत आहोत, परंतु त्यामध्ये मूलभूत तीनच विषय महत्वाचे आहेत. पहिले म्हणजे लग्नाच्या वेळेला वय कमी असणे, मल्टिपल प्रेग्नसी असणे, ही दोन अतिशय महत्वाची कारणे आहेत. समितीने विचारणा केली की, तुमच्याकडे किती लाभार्थी सापडले की, त्यांचे वय कमी होते असे नाही. यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, युनिसेफचे रेकॉर्ड त्याच्यासाठी आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, समितीच्या निमित्ताने काहीतरी निष्पन्न झाले पाहिजे. काही तरी सुधारणा झाली पाहिजे, पुरक पोषण आहारामध्ये (टी. एच.आर.) कच्चे धान्य देऊन उपयोग काय. यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, आयएमआर, फिमेल मोर्टलिटी, मोर्टलिटीच्या फिगर्समध्ये फरक पडलेला आहे. ही संख्या अत्यंत नगन्य झालेली आहे असे म्हणता येणार नाही. कारण आज आयएमआरचा रेट १९ वर आलेला आहे. जो ५ वर्षांपूर्वी २४ वर होता. आकडेवारी कमी होत आहे.

समितीने संबंधितांना निदेश दिले की, भंडारा जिल्ह्यामध्ये समितीने पंचायत समितीनिहाय माहिती काढली आहे. अति कमी वजनाची भरपूर बालके सापडली आहेत. समितीने वेळोवेळी याबाबत सूचना केलेल्या आहेत. दर थोडा कमी झालेला आहे. परंतु अधिक गतिमानता आणून हा दरअधिक कमी करता येईल याकरीता प्रयत्न करणे गरजेचे आहे. विभागाकडे सर्व यंत्रणा असतांना ती खालपर्यंत काम करीत नाही, ती कार्यान्वीत केली पाहिजे. याकरीता तुम्ही पाठपुरावा करणे, सचिवांनी आढावा घेणे हे करणे गरजेचे आहे. भविष्यात कमी वजनाची बालके तयार होणार नाहीत, सुदृढ बालके होण्याकरीता पौष्टीक पोषण आहार मिळाला पाहिजे. त्याकरीता त्यांना आयडेंटीफाय करून त्यांना तो पौष्टीक पोषण आहार देणे गरजेचे आहे. याबाबत धोरण तयार करण्यात यावे व त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच अति किंवा कमी वजनाच्या बालकांची सर्व माहिती मागविण्यात यावी. एक महिन्यानंतर समितीच्या पुढील बैठकीत ही माहिती सादर करावी. यावर प्रधान सचिव, महिला व बालविकास अधिकारी यांनी होकारात्मक उत्तर दिले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, पंचायत समिती, भंडारा अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमध्ये सन २०१८-२०१९ मध्ये तीव्र कुपोषित बालकांची संख्या २११ होती ही बाब अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. कुपोषित बालकांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने गरोदर मातांना स्तनदा मातांना आहार दिला जातो. बालक अंगणवाडीत वा शाळेत असताना आहार दिला जातो तरी देखील तीव्र कुपोषित बालकांची संख्या वाढत आहे यावरून अशी शंका उपस्थित होत आहे की, पूरक पोषण आहार (टीएचआर) पौष्टीक व योग्य नसतो किंवा लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नाही. बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी समिती समोर विशद केल्यानुसार ६ हजार लाभार्थ्यांना पूरक पोषण आहार पुरवठा करण्यात येतो. महिन्याचे पूरक पोषण आहाराचे (टीएचआर) देयक जवळपास रुपये १३ लाख एवढे होते म्हणजे वर्षाला रुपये १५६ लाख एवढा खर्च होतो. २११ कुपोषित बालकांपैकी १५१ तीव्र कुपोषित बालके आहेत. एकात्मिक बाल विकास सेवा येजना प्रकल्पातर्गंत पंचायत समिती, भंडारा मध्ये २०३ अंगणवाडी केंद्र कार्यरत आहेत. कार्यरत अंगणवाडी केंद्राचे कार्यक्षेत्रात गरोदर माता, स्तनदा माता आणि ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांना पूरक पोषण आहार (टीएचआर) पुरवठा करण्यात येतो आणि अंगणवाडी स्तरावर ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांसाठी पूरक पोषण आहार पुरवठा करण्यात येतो. समितीने भंडारा तालुक्यातील एका प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली असता तेथील प्रसृति झालेल्या महिलेला पूरक पोषण आहार (टीएचआर) सेवन केलेला आहे काय अशी विचारणा केली असता त्या महिलेला पूरक पोषण आहार (टीएचआर) काय आहे हेच माहिती नसल्याचे समितीला निदर्शनास आले. तिने गरोदरावस्थेत पूरक पोषण आहाराचे सेवन केलेले नव्हते. यावरून पूरक पोषण आहार पुरवठा व वाटपाबाबत विभागाचे गांभीर्य दिसून येत नसून अत्यंत निष्काळजीपणा व हेळसांड झाल्याचे दिसून येते, त्यामुळे समिती या प्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीस विशद करण्यात आले की, राज्यात दिनांक १ मे, २०१९ पासून पूरक पोषण आहार (टीएचआर) पुरवठा पूर्णपणे बंद करण्यात आलेला असून पर्यायी व्यवस्था म्हणून कच्चे धान्य देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे त्यामध्ये गहू,तांदूळ,गोडेतेल,मीठ आणि हळद या वस्तू पूरक पोषण आहार देते वेळी इंधनाचा ५० पैशाच्या निधीची कपात करण्यात येत होती. तो निधी धान्याच्या स्वरूपात लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. सदरहू कच्चा आहार लाभार्थी शिजवून खातील तथापि, **समितीच्या मते पूरक पोषण आहारास कच्चे धान्य दिल्यामुळे लाभार्थी ते धान्य त्यांच्या घरी शिजवून खातीलच याची शाश्वती देता येणार नाही. याकरीता धान्य पुरवठा केल्यानंतर लाभार्थी पुरवठा केलेले धान्य सेवन करतो किंवा कसे हे पाहण्याची यंत्रणा महिला व बालविकास विभागाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे या योजनेचा हेतू सफल होणार नाही असे दिसून येते त्यामुळे सॅम व मॅम कुपोषित बालकांची संख्या कमी व्हावी म्हणून पौष्टीक व सकस आहार पूरक पोषण आहाराच्यामाध्यमातून लाभार्थ्यांना मिळावा, जेणेकरून भविष्यात कमी वजनाची बालके जन्माला येणार नाहीत व सुदृढ आणि सशक्त बालके जन्माला येतील याकरीता उपरोक्त बाबींचा सखोल विचार करून शासनाने पुरक पोषण आहाराच्या (टी.एच.आर.) संबंधात तसेच लाभार्थ्यांना कच्चे धान्य देण्याबाबतच्या धोरणा बाबतचा पुर्ण विचार करावा व आधीच्या धोरणात काही त्रुटी असल्यास त्यात योग्यत्या सुधारणा करून एक निश्चित धोरण ठरवून याबाबत निर्णय घ्यावा, जेणे करून शासनाच्या महत्वाकांक्षी धोरणाची फलश्रूती होईल व त्याचा लाभ गरजू लाभार्थ्यांस प्राप्त होईल. याबाबत शासनाने लवकरात लवकर कार्यवाही करावी, जेणेकरून या योजनेतील त्रुटी दूर होऊन त्याची अंमलबजावणी करता येणे सुकर होईल अशी समिती शिफारस करीत आहे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत समितीला पाठविण्यात यावा.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, भंडारा (प्रशासन)

### जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून भुमीहीन लोकांना भूखंड मिळणेबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १ ते ३ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत भंडारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, ग्रामीण भागामध्ये शासकीय आबादी तयार करण्यासाठी शासन डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून पैसे देत आहे. भूमिहीन लोकांना मोफत पट्टे मिळावेत यादृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे. शासकीय आबादी तयार केल्यानंतर जिल्हा परिषदेने तेथील सरपंच किंवा ग्रामसेवक यांच्याकडून भुमिहीन लोकांची यादी मागवून घेतली पाहिजे. त्यानंतर सदर यादीतील सर्व लोक भुमिहीन आहेत का याची खात्री करूनच त्या लोकांना भूखंड दिले पाहिजे. ग्रामीण भागातील अनेक लोक या योजनेपासून वंचित आहेत. त्यामुळे सदर विषयासंदर्भात महसूल व ग्रामविकास सचिवांची एकत्र साक्ष आयोजित करण्यात यावी, असे निदेश समितीने संबंधितांना दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामीण भागांमध्ये भुमीहीन लोकांना भुखंड मिळावेत यासाठी जिल्हा नियोजन विकास समिती (डीपीडीसी) च्या माध्यमातून शासनातर्फे मदत दिली जाते तथापि, ग्रामीण भागातील अनेक लोक वंचित राहात असल्याप्रकरणी महसूल व ग्राम विकास विभागाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकुल करण्याबाबत ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/योजना-१०, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ नुसार धोरण निश्चित केलेले आहे. या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही केली जाते.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय.**

**(१) ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-**

राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, आदिम आवास योजना या योजनांतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेतील घरकुल पात्र लाभार्थी जागेअभावी घरकुलाचा लाभ मिळण्यापासून वंचित रहात असल्याची बाब विचारात घेऊन राज्यशासनाने पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना शासन निर्णय क्रमांक प्रआयो-२०१७/प्र.क्र.६०/योजना-१०, दिनांक १४ जुलै, २०१७ अन्वये सुरू केलेली आहे. या योजनेअंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्यपुरस्कृत योजनांतर्गत घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या कुटुंबांना जागा खरेदीसाठी रुपये ५०,००० पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते.

शासन निर्णय क्रमांक पीडीयु-२०१८/प्र.क्र.२५७/यो-१०, दिनांक २ ऑगस्ट, २०१८ अन्वये राज्यातील ग्रामीण भागातील केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत घरकुल पात्र लाभार्थ्यांना जागेअभावी घरकुलाचा लाभ देण्यासाठी पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थ सहाय्य योजनेंतर्गत शासकीय जमिनी मूल्यविरहित उपलब्ध करून देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच जिल्हा परिषदेने नमुद केल्यानुसार सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकुल करण्याबाबत ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/योजना-१०, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ नुसार धोरण निश्चित केलेले आहे.

**(२) महसूल विभागाचे अभिप्राय :-**

ग्रामीण भागातील भूमिहीन लोकांना सरसकट भूखंड वाटप करण्याबाबत महसूल विभागातर्फे कोणतीही योजना सद्यःस्थितीत अस्तित्वात नाही. तथापि, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ मधील नियम-२९ नुसार भटक्या जमातीच्या, विमुक्त जातीच्या आणि मागासवर्गाच्या व्यक्तींच्या व भूमिहीन शेतमजुरांच्या पुनर्वसनासाठी शासनाने विशेष योजना हाती घेतल्या असतील अशा व्यक्तींना, त्याबाबतीत करण्यात आलेले अर्ज मिळाल्यावर राज्य शासन वेळोवेळी ठरवील अशा आकाराच्या इमारती जागांबाबतचे भोगवट्याचे अधिकार देता येतील. तसेच या नियमातील नियम ४५ नुसार मागासवर्गांच्या व्यक्तींनी निवासव्यवस्थेच्या प्रयोजनाकरिता केलेले अतिक्रमण राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे विहित करेल अशा आकाराचे, विनामूल्य आणि आकारणीशिवाय देण्याची तरतूद आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने भंडारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून भूमिहीन लोकांना भूखंड मिळणेबाबत विचारणा केली असता. यावर प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विशद केले की, पूर्वी प्लॉट देण्याची फक्त गावठाण ही एकच व्यवस्था होती. पण आता नवीन योजनेनुसार पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी कार्यक्रम सुरू केलेला आहे. ज्या लोकांच्या स्वतःच्या नावावर भूखंड नाही तिथे कोणीतरी अतिक्रमण करते. यावर समितीने विचारणा केली की, या ठिकाणी तसा विषय नाही. ग्रामविकास विभागाने पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी योजना आणि सन २०११ पूर्वीचे अतिक्रमण नियमानुकुल करण्याचे अधिकार बीडीओला देण्याची योजना अशा दोन योजना सुरू केल्या आहेत. यावर प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विशद केले की, अतिक्रमणाचा शासन निर्णय निघाल्यापासून ४ लाख ६० हजार अतिक्रमणाची नोंद संगणकावर झाली आहे आणि जवळपास २ लाख ९६ हजार अतिक्रमणांना ग्रामसभेने मंजूरी दिली आहे. त्याचा तळटप्पा म्हणून १ लाख ३ हजार गावठाण अतिक्रमणाबद्दलची कारवाई सुरू आहे. ग्रामसभेने १ लाख गावठाण आणि सीओंनी ११ हजार गावठाण मंजूर केले आहेत. या महिन्याच्या अखेर आम्ही १ लाख गावठाण मंजूर करण्याचा शब्द माननीय मुख्यमंत्र्यांना दिलेला आहे.

समितीने विचारणा केली की, हा विषय असा होता की, गावामध्ये जी नवीन आबादी त्याचा उद्देश असतो की, कुटुंबाची संख्या वाढणे, लोकसंख्या वाढणे, भूमिहिनांची संख्या वाढणे अशा परिस्थितीत शासन जी आबादी ती कमी दराने किंवा मोफत दराने गरिबांना भेटली पाहिजे. त्याचा असा चुकीचा अर्थ काढण्यात आला की, ग्रामपंचायत ज्यांची शिफारस करते त्याला पट्टे दिले जातात. प्रत्यक्षात तालुका पातळीवर माननीय आमदारांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समन्वय समितीच्या अजेंड्यावरील पहिला विषय हा भूमिहिनांना प्लॉट देणे. त्या शासन निर्णयाचा आपण अभ्यास केला तर त्यानुसार सरकारची जबाबदारी आहे की, भूमिहिनांची संख्या तहसिलदारांच्या लक्षात आणून देणे. पण आतापर्यंत तसे झाले नाही. एखाद्या व्यक्तीच्या स्वतःच्या जागेत त्याच्या घराची इमारत बांधली असेल तरी पण तो आबादीच्या जागेत भूखंड (प्लॉट) मागतो. ग्रामपंचायत त्याची शिफारस करते म्हणून आपण त्याला पट्टा देतो ही अत्यंत चुकीची कार्यवाही आहे. भूमिहिनांना आगोदर प्लॉट मिळणे हा शासनच्या ले आऊटचा उद्देश आहे. पण असे होत नाही. तहसिलदार ग्रामपंचायतमध्ये यासाठी जाहीरनामा लावतो की, तुम्ही केलेल्या शिफारशीवर कोणाचाही आक्षेप असू नये. यावर प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विशद केले की, आता ती पद्धत बदलली आहे. सन २०११ मधील शासनाकडे असणा-या एसीसीच्या यादीमध्ये भूमिहिन किंवा घरासाठी पात्र असणारे व्यक्ती होते, त्यांची पीडब्ल्युएप्रमाणे वेटिंग लिस्ट यादी आहे. त्या यादीच्या बाहेर आपण जात नाही. या यादीमध्ये असणा-या भूमिहिन लोकांना ५० हजार रुपये देऊन जागा विकत घेण्याची...(अडथळा)... आता सरकारला भूमिहिनांची यादी ग्रामसभा देत नाही. यावर समितीने विचारणा केली की, गावात ग्रामपंचायतीकडे भूमिहीनांची नोंद असते. एका गावात १०० एकरमध्ये सरकारी आबादी प्लॉट पडले. पण सरकारी ले आऊट मिळण्यासाठी २०० भूमिहीनांची यादी सरकारने दिलेली आहे. मग त्या २०० लोकांना पट्टे भेटले पाहिजेत, पण ते भेटत नाहीत. यावर प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विशद केले की, ज्या लोकांची नावे यादीमध्ये आहेत, त्यांना सोडून इतरांना संगणक भूखंड (प्लॉट) घेण्यास परवानगी देत नाही कारण तेवढ्याच लोकांची नावे संगणकामध्ये नमूद असतात.

समितीने विचारणा केली की, हे लोक भूखंडावर अतिक्रमण करतात. मग ते अतिक्रमण नियमानुकुल करण्यासाठी एसडीओकडे जातात. नंतर तो सक्षम अधिकारी आपल्या सरकारी दराने त्यावर दंड आकारुन त्याला पट्टा इश्यु करतो. यामुळे भूमिहिन प्लॉटपासून वंचित राहून भूमिहिनच राहतो. सरकारकडे असणारी यादी फक्त कागदावरच राहिली आहे. आपण जे सांगत आहात ते गावठाण व्यवस्थेबद्दल आहे. याची यादी वेगळी असते. यावर प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विशद केले की, आज प्रत्येक गावात कोणकोण भूमिहिन आहे ते एसीच्या यादीमधून काढले जाते.

समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायतीमार्फत गावठाण विस्ताराची शिफारस करण्याची जबाबदारी ग्रामविकास विभागाची आहे. ही शिफारस करताना आपण गरिबांची, भुमिहिनांची यादी जोडतो. पण जेव्हा पट्टे वाटपाची वेळ येते तेव्हा गावातील श्रीमंत माणूस त्या जागेची मागणी करतो किंवा तिथे अतिक्रमण करतो. यावर प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विशद केले की, कोणत्याही गावामध्ये गावठाण विस्तार होत असल्यास तिथे जागा वाटप करताना पीडब्ल्युडीच्या यादीतील लोकांना जोपर्यंत जागा वाटप होत नाही तोपर्यंत यादीच्या बाहेरच्या लोकांचा विचार करण्यात येत नाही. 'ग्रामपंचायतीच्या शिफारशीनुसार' असे कायद्यामध्ये आहे परंतु ग्रामपंचायत कधी कधी चुकीची शिफारस करु शकते. आपण असे बंधनकारक करून घेऊ की, जोपर्यंत या यादीतील लोकांची नावे संपत नाहीत तोपर्यंत दुस-यांच्या नावाची शिफारस करता येत नाही. तसेच शासनाने गावठाणच्या बाहेरची जागा घरासाठी विकत घेण्यासाठी ५० हजार रुपयांची तरतूद केली. यावर समितीने विचारणा केली की, ज्या गावामध्ये गावठाण विस्तारासाठी स्कोप नाही आणि ज्याला घराची आवश्यकता आहे त्याला ५० हजार रुपये द्यायचे होते. यावर प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विशद केले की, ज्या ठिकाणी गावठाण विस्तारासाठी स्कोप आहे तिथे पण आपण ते विचारात घेत नाही.

समितीने विचारणा केली की, माझ्या गावात ५० भूखंड (प्लॉट) रिकामी आहेत. ते भूखंड (प्लॉट) भूमिहिन लोकांना भेटले पाहिजेत. गावठाण विस्ताराच्या कार्यक्रमात महसूल विभागाकडून येणारी नावे पक्की असायची. योजना करताना किंवा प्रस्ताव देताना ही नावे पक्की व्हायची. यावर प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विशद केले की, आरएमएफडीला आम्ही दोन्ही प्रकारचे पत्र लिहितो की, गावठाण विस्तारामध्ये जो भूखंड वाटपासाठी शिल्लक राहिले असतील तर पीडब्ल्युडीची यादी संपल्याशिवाय दुस-यांना भूखंड वाटप करु नये याबाबत एक पत्र सर्क्युलेट करा असे समितीने निदेश प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, ग्रामीण भागांमध्ये भूमिहीन लोकांना भूखंड मिळावेत यासाठी जिल्हा नियोजन विकास समिती (डीपीसी) च्या माध्यमातून शासनातर्फे मदत दिली जाते. तथापि, ग्रामीण भागातील अनेक लोक भूखंड मिळण्यापासून वंचित राहिले आहेत. राज्य शासनाने पंडित दिन दयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना दिनांक १४ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरू केलेली आहे. या योजनेतंर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या कुटुबांना जागा खरेदीसाठी रूपये ५० हजार पर्यंत अर्थ सहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. तसेच दिनांक २ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील ग्रामीण भागातील केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत घरकुल पात्र लाभार्थ्यांना जागेअभावी घरकुलाचा लाभ देण्यासाठी पंडित दिन दयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थ सहाय्य योजनेतंर्गत शासकीय जमिनी मुल्यविरहीत उपलब्ध करून देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकुल करण्याबाबत ग्रामविकास विभागाच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार भंडारा जिल्ह्यामध्ये आजपर्यंत किती लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यात आला आहे. तसेच **दिनांक १४ जुलै, २०१७ व दिनांक २ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये भंडारा जिल्ह्यातील भुमिहीन लोकांना भूखंड घेण्यासाठी व घरकुल बांधकामासाठी अर्थ सहाय्य करण्याबाबत संबंधीत लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात यावेत व त्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसल्यास, पंडित दिन दयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत लाभ देऊन बेघरांना घर देण्यासंदर्भात सत्वर व तातडीने कार्यवाही करून नियमाप्रमाणे घरांकरिता कोणीही वंचित राहणार नाही याची दक्षता घेऊन कारवाई करावी याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, भंडारा (प्रशासन)

### राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राबविणेबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ०१ ते ०३ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत भंडारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (आर.बी.एस.के.) अंतर्गत भंडारा जिल्ह्यामध्ये किती पथके आहेत व त्या पथकाने आतापर्यंत किती विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी केलेली आहे. त्यासंदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक यांनी माहिती द्यावी. यावर तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सालय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, आर.बी.एस.के. अंतर्गत काम करण्यासाठी भंडारा जिल्ह्यामध्ये एकूण १६ पथके स्थापन केलेली आहेत. यावर समितीने विचारणा केली की, भंडारा जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी यांना हाच प्रश्न विचारला असता त्यांनी ८ पथके स्थापन करण्यात आल्याचे खोटी माहिती समितीला दिलेली आहे. सभागृहाला खोटी माहिती दिल्यामुळे समिती प्रमुखांनी त्यांच्यावर कारवाई करावी. यासंदर्भातील सर्व माहिती जिल्ह्यातील सर्व अधिका-यांना माहिती असणे आवश्यक आहे, व ते त्यांचे कर्तव्य आहे. यावर तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सालय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, या १६ पथकांपैकी भंडारा आणि साकोली तालुक्यांमध्ये तीन पथके कार्यरत आहेत. तुमसर तालुक्यामध्ये तीन पथके कार्यरत आहेत आणि उर्वरित तालुक्यांमध्ये दोन-दोन पथके कार्यरत आहेत. या पथकाद्वारे तपासणी करण्यात आल्याची सर्व माहिती ही तालुका आरोग्य अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येते. सदर माहिती शिक्षणाधिकारी यांच्याकडे देखील पाठविण्यात येते.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, आरोग्य विभागातील एकूण किती पदे रिक्त आहेत. यावर तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सालय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, वैद्यकीय अधिका-यांची (एम.ओ.) सहा पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्यासंदर्भात तसा प्रस्ताव देखील शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर भरती प्रक्रियेसाठी तात्पुरती देण्यात येत असल्याचे एक पत्र दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी आरोग्य विभागास प्राप्त झालेले आहे.

समितीने विचारणा केली की, जिल्ह्यातील बालकांची आरोग्य तपासणी करण्यासाठी कोणती पर्यायी व्यवस्था आपण केलेली आहे. यावर तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सालय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, थोडेसे समायोजन करून सदर तपासणी करण्यात येणार आहे.

समितीने विचारणा केली की, तीन महिने झाले तरी आपण यासंदर्भात काहीच निर्णय घेतलेला नाही का ? यावर तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सालय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, सदर तपासणीचा कार्यक्रम सुरू करणार आहोत. यापूर्वी अंगणवाड्यातील बालकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आलेली आहे.

समितीने विचारणा केली की, आता पर्यंत सर्वच अंगणवाड्यातील बालकांची तपासणी झालेली आहे का यावर तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सालय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, होय. जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्याची तपासणी झालेली आहे.

समितीने विचारणा केली की, मग यासंदर्भातील सर्व माहिती गट विकास अधिकारी, शिक्षणाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे का पाठविण्यात आलेली नाही. यावर तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सालय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, सदर तपासणीचा सर्व अहवाल हा जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे.

समितीने विचारणा केली की, त्यांनी माहिती दिली नाही तर काय करायचे, त्यांच्यावर कोणाचे नियंत्रण आहे. यावर वैद्यकीय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, त्यांच्यावर जिल्हा शल्य चिकित्सालय (सिव्हिल सर्जनचे) नियंत्रण असते.

यावर समितीने विचारणा केली की, ते आज कुठे आहेत ? आपल्याला जागा भरतीसाठी स्थगिती आहे. आज १६ टीम काय काम करीत आहेत. यावर वैद्यकीय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, त्यांचे काम सुरू आहे.

समितीने विचारणा केली की, आज ते काय काम करीत आहेत. १६ टीम आणि एक टीममध्ये ४ जण अशाप्रकारे ६४ जण असणार आहेत, त्यातील ६ जागा रिक्त आहेत, ५८ जण काय काम करीत आहेत. त्यांच्याबरोबर १६ वाहने देखील असतील. यावर वैद्यकीय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, आतापर्यंत तपासलेल्या अंगणवाड्यांचा खर्च रु.९४,१७७ झाला आहे.

समितीने विचारणा केली की, अंगणवाड्या तपासण्याचा कार्यक्रम उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण व तालुक्याचे एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे आहे का? कारण काल ब-याच पंचायत समित्यांमध्ये एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी हा कार्यक्रम आमच्याकडे नाही असे लेखी उत्तरात सांगितले आहे. मग अंगणवाड्यांतील बालकांचे आरोग्य तपासण्याचा कार्यक्रम

पार पाडला हे आपण कशाच्या आधारे सांगत आहात. यावर वैद्यकीय अधिकारी यांनी समितीस विशद केले की, अंगणवाड्यांमधील एकूण ७०,४४० मुले तपासली आहेत, त्यातील काही मुले हृदयरोगाची आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, एका तालुक्यात ३० हजार विद्यार्थी आहेत आणि ७० हजार विद्यार्थ्यांची तपासणी पार पडली आहे. सदर बाबतीत गांभीर्य काय आहे, कार्यक्रम काय आहे या संदर्भात सिव्हिल सर्जन सांगू शकतील का? कार्यक्रमाची प्रत गट विकास अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे मिळाली नाही. मग कशावरून हा कार्यक्रम झाला आहे. अंगणवाडी सेविका, मदतनीस, मुख्याध्यापक यांना पथक येणार आहे ही पूर्वकल्पना (ॲडव्हान्समध्ये) माहित नसेल तर मुले गैरहजरच राहतील. त्यामुळे पंचायत समिती क्षेत्रातील ही मुले आरोग्य तपासणीपासून वंचित आहेत. सरकारचा पैसा वाया जात आहे असे आमचे म्हणणे आहे. आपल्यामध्ये कोणत्याही प्रकारचा समन्वय नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, हे वर्ष आताच सुरू झाले आहे. कार्यक्रम सुरू आहे. परंतु समन्वयाचा गोंधळ आहे. यामध्ये सुधारणा करु. यावर निदेश दिले की, सुधारणा करून घेतो असा विषय नाही. विषय गंभीर आहे. आरबीएसके या कार्यक्रमाद्वारे शालेय विद्यार्थ्यांची तपासणी करायची आहे. मुलांची आरोग्य तपासणी अशा बाबी त्या कार्यक्रमात येत असतात आणि पथक (टीम) तपासणी करीत असते. आपल्या मुलांची आरोग्य तपासणी व्यवस्थित होते की नाही हे पाहणे जिल्हा परिषदेच्या अधिका-यांचे काम आहे, यांनी तसे केले नाही, त्यामुळे यांच्यावर कारवाई निश्चित करावी. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (आरबीएसके) कार्यक्रमामध्ये पथक (पथक) ठरली आहे, सदस्य ठरले आहेत, शासनाच्या मार्गदर्शक सूचना (गाईडलाईन्स) आहेत. मग अंमलबजावणीच्या संदर्भात कोणालाही माहिती असू नये ही गंभीर बाब आहे. ज्या व्यक्तींवर जबाबदारी सोपविली आहे, त्यांनी काम करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाच्या संदर्भात लोकांना माहित नसावे, जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या अधिका-यांना माहित नसावे ही बाब गंभीर आहे. हा कार्यक्रम ब-याच वर्षांपासून सुरू असतानाही याबाबत माहित नसावे हे योग्य नाही. यामध्ये लक्ष न घालणे, जाणीवपूर्वक या बाबींकडे दुर्लक्ष करणे, आपली जबाबदारी ढकलणे या बाबी गंभीर आहेत, त्यामुळे चौकशी झाली पाहिजे. ज्यांनी या जबाबदारीतून अंग काढून घेण्याचे काम केले आहे, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी आणि यापुढे असे होणार नाही याची दक्षता घ्यावी. कार्यक्रमाची माहिती सर्व लोकांना माहित असली पाहिजे. बैठका झाल्या पाहिजेत. जिल्ह्याचे प्रमुख म्हणून तुमची जबाबदारी आहे. जबाबदारी पार पाडली नाही, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी, आवश्यकता असेल तर कारवाई करावी आणि समितीला तत्संदर्भातील अहवाल सादर करावा. संपूर्ण राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (आरबीएसके) कार्यक्रम व्यवस्थित राबविण्यात येत नसल्यामुळे या संदर्भात आरोग्य, शिक्षण, ग्रामविकास विभागांच्या सचिवांची साक्ष लावण्यात येत आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम राबविणेबाबत :-** संपूर्ण राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (आरबीएसके) व्यवस्थितरित्या राबविल्या जात नसल्याप्रकरणी सार्वजनिक आरोग्य, शालेय शिक्षण व महिला व बालविकास विभागाने एकत्रितरित्या उपरोक्त कार्यक्रम व्यवस्थितरित्या राबविण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

- राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात सन २००८-०९ पासून सुरू करण्यात आलेला असून सन २००८-२००९ पासून सन २०१२-१३ पर्यंत शालेय विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात येत होती त्यानंतर सन २०१३-१४ पासून शालेय विद्यार्थ्यांसोबत अंगणवाडीतील बालकांची तपासणी करण्यात येत आहे.

- राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत भंडारा जिल्यातील शालेय विद्यार्थ्यांची तपासणी व अंगणवाडीतील बालकांची तपासणी करण्याकरीता भंडारा जिल्ह्यात एकूण १६ तपासणी पथक कार्यरत आहेत.

- राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत तपासणी पथकात वैद्यकीय अधिकारी (पुरुष) वैद्यकीय अधिकारी (महिला) औषध निर्माता व परिचारिका असे ४ अधिकारी कर्मचारी एका पथकामध्ये कार्यरत असतात.

- राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत भंडारा जिल्ह्यातील एकूण ७ तालुक्यात तपासणी पथक कार्यरत असून प्रत्येक तपासणी पथक तालुक्यातील आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग व महिला व बाल विकास विभाग बाल विकास प्रकल्प अधिकारी, गट शिक्षणाधिकारी तालुका आरोग्य अधिकारी यांच्याशी प्रत्यक्ष समन्वय साधून प्रत्येक तपासणी पथक वरील अधिकारी कर्मचारी यांना दौरा दैनंदिनी व मासिक प्रगती अहवाल दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देण्यात येतो तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (रा.बा.स्वा.का.) अंतर्गत घेत असलेल्या शिबिरांचा अहवाल संबंधित विभागाला वेळोवेळी देण्यात येतो यापुढेही संबंधित विभागाशी समन्वय ठेवण्यात येईल.

• तालुका स्तरावरून राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (रा.बा.स्वा.का.) तपासणी पथकाद्वारे खंड विकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांना तपासणीचा अहवाल देण्यात येत असतो, तसेच शाळा तपासणीबाबतची पुर्वसूचना एक दिवस अगोदर शाळेतील मुख्याध्यापक व अंगणवाडी तपासणीची पूर्वसूचना अंगणवाडी सेविका यांना देऊन बालकांची तपासणी करण्यात येते व तपासणीबाबतचा अहवाल शाळेतील मुख्याध्यापक व अंगणवाडी सेविका यांना देण्यात येतो.

• राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., भंडारा यांचे अध्यक्षतेखाली संबधित विभागाशी समन्वय राखण्याकरिता खालील प्रमाणे वर्षनिहाय समन्वय सभा आयोजित करण्यात आलेल्या होत्या.

| अ.क्र. | सन | सभा दिनांक |
|---|---|---|
| (१) | सन २०१३-१४ | ३०/०३/२०१३ |
| (२) | सन २०१४-१५ | ०६/०५/२०१४ |
| (३) | सन २०१५-१६ | २७/०७/२०१५ |
| (४) | सन २०१६-१७ | ११/०३/२०१६ |
| (५) | सन २०१७-१८ | ०५/०४/२०१७ |

• सन २०१८-१९ ला दिनांक २५ जुलै २०१८ ला राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियामक मंडळाची सभा घेण्यात आली. त्यामध्ये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सदर सभेमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाचे सन २०१८-१९ चा शालेय व अंगणवाडी तपासणीचा कृति आराखडा सादर करण्यात आला, तसेच तपासणी पथकामार्फत सन २०१३-१४ पासून संदर्भीत केलेल्या बालाकांना उपचार व शस्त्रक्रियाबाबतचा अहवाल सादर करण्यात आला.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**(१) महिला व बाल विकास विभागाचे अभिप्राय.—**जिल्हा परिषद, भंडारा यांचे अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

**(२) सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय.—**सदर कार्यक्रमाचे संनियत्रण अतिरिक्त संचालक (कु.क.मा.बा.संगोपन) पुणे मार्फत केले जाते. राज्यामध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम सन २०१३-१४ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार सर्व कृतीची अंमलबजावणी करण्यात येते. या कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील सर्व अंगणवाड्यांमधील ० ते ६ वर्षे वयोगटातील तसेच, शासकीय व शासकीय अनुदानित शाळांमध्ये ६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांची तपासणी व उपचार करण्यात येतात. तपासणीअंती केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या ३८ आजारांचे व्यवस्थापन करण्यात येते. अंगणवाडीतील प्रत्येक मुलाची वर्षातून २ वेळेस तसेच शाळेतील प्रत्येक मुलाची वर्षातून १ वेळेस तपासणी करण्यात येते. शाळा तपासणीसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये शाळांच्या संख्येनुसार दरवर्षी माहे मार्च मध्ये वर्षभराचा आगाऊ फिरतीचा कार्यक्रम तसेच जिल्ह्यामधील सर्व अंगणवाड्यांसाठी वर्षातून २ वेळेस आगाऊ फिरतीचा कार्यक्रम तयार करण्यात येऊन शालेय शिक्षण विभाग तसेच महिला व बालकल्याण विभागाच्या जिल्हास्तरीय अधिका-यांना देण्यात येतो. त्यांच्याकडून जिल्ह्यातील सर्व शाळा व अंगणवाडयांना हा कार्यक्रम देण्यात येतो, जेणेकरून आरोग्य तपासणी वेळी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची खात्री करता येते. या कार्यक्रमांचा वेळोवेळी आढावा राज्यस्तरावरून घेण्यात येतो.

**(३) शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय.—**विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी नियमित होण्यासाठी आरोग्य विभागासोबत समन्वय साधून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी नियमित होईल, याकडे लक्ष देवून प्रत्येक विद्यार्थ्याची स्वतंत्र आरोग्य पत्रिका (Health Card) तयार करण्याबाबत सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना कळविण्यात आले आहे. तसेच, शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पात्र असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना आपल्या क्षेत्रिय यंत्रणेला देण्यात येऊन सदर तपासणी नंतर संबंधित शाळांची जिल्हानिहाय संकलित माहिती संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे व राज्याची एकत्रित माहिती शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्याकडे विहित प्रपत्रात पाठविण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागास कळविण्यात आले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने भंडारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राबविणेबाबत. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, समन्वयाची बाब होती. सार्वजनिक आरोग्य विभाग, शालेय शिक्षण, महिला व बाल विकास विभाग या सर्व विभागांनी एकत्रितरित्या कार्यक्रम राबवायचा आहे. याकरिता यंत्रणा निर्माण करून पद्धत ठरविण्यात आलेली आहे. आता गट शिक्षण अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी (टी.एच.ओ.), एकत्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी (सी.डी.पी.ओ.) या सर्वांना ॲडव्हान्स टूर प्रोग्राम दिला जातो. टूर प्रोग्राम असा असतो की, कोणत्या महिन्यामध्ये कोणत्या अंगणवाडीची तपासणी केली जाणार आहे. तसेच याबाबत एक दिवस अगोदर मुख्याध्यापकांना दुरध्वनी करून कळविले जाते. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक एक्झीक्युटीव्ह कार्यकारी समितीची मासिक बैठक घेतात. त्यामध्ये शालेय शिक्षण विभाग, महिला व बाल कल्याण विभागाचे कर्मचारी उपस्थित असतात.

समितीने विचारणा केली की, सर्व ठिकाणी योग्य व व्यवस्थितपणे तपासणी होत आहे काय? यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, होय, परंतु त्यावेळी केवळ समन्वयाचा विषय होता. पुढे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, शाळेमध्ये जायचे असेल तर त्याबाबत मुख्याध्यापकांना कळविण्यात यावे, अशा सूचना संबंधितांना केलेल्या आहेत.

समितीने विचारणा केली की, आपण हे चांगले अभियान राबवितो. पंचायत समिती सदस्य, सभापती, शाळा व्यवस्थापन समिती यांना माहिती दिली पाहिजे. खालील स्तरावरील सर्व लोकप्रतिनिधींना या अभियानाची माहिती दिली पाहिजे. पंचायत समितीचे गट विकास अधिकारी (बी.डी.ओ.), गट शिक्षण अधिकारी (बी.ओ.) यांना देखील याबाबतची माहिती रहात नाही. परस्पर तपासणी होऊ नये. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, (आर.बी.एस.के.) मार्फत तपासणी करून संशयीत आढळून आल्यावर तालुका स्तरावर संदर्भ सेवा शिबीर घेतले जाते. त्यानंतर काही रुग्णालयांशी करार केलेला आहे व तेथे कार्डिॲक सर्जरी किंवा इतर सर्जरी संदर्भात इंडियन पेडिॲट्रीक असोशिएशन बरोबर करार केलेला आहे. पेडिॲट्रीक सर्जन व ऑर्थोपेडीक असोसिएशन सोबत आम्ही करार केलेला आहे. कोणत्या वर्षात किती बालकांची सर्जरी करून घेतलेली आहे याची आपल्याकडे आकडेवारी उपलब्ध आहे.

समितीने विचारणा केली की, यासंदर्भात तालुका आरोग्य अधिका-यालाही माहिती रहात नाही. गट शिक्षण अधिकारी (बी.ओ.) लाही माहिती रहात नाही. हे अभियान आरबीएसके अंतर्गत राबविले जाते. परंतु संबंधित तालुक्यांच्या पंचायत समिती सदस्य व पंचायत समिती सदस्यांना माहिती दिली जात नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र, लोकप्रतिनिधी, सरपंच, सदस्य यांना माहिती दिली तर त्यांनाही उपस्थित राहणे शक्य होईल व व्यवस्थित तपासणी केले जाईल. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, ठीक आहे. यासंदर्भात जिल्हास्तरावर समन्वयाची सूचना दिली जाईल. यासंदर्भात संबंधित तालुक्यातील लोकप्रतिनिधींनाही कळविण्यात यावे अशा सूचना सर्व जिल्ह्यांना दिल्या जातील.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (आरबीएसके) राबविण्यासाठी भंडारा जिल्ह्यामध्ये एकूण १६ पथके स्थापन करण्यात आलेली आहेत. एका पथकामध्ये ४ जण या पथकांमार्फत विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी केलेली आहे. भंडारा व साकोली तालुक्यांमध्ये तीन पथके कार्यरत आहेत, तुमसर तालुक्यामध्ये तीन पथके कार्यरत आहेत आणि उर्वरित तालुक्यांमध्ये दोन-दोन पथके कार्यरत आहेत. या पथकाद्वारे तपासणी करण्यात आल्याची सर्व माहिती ही तालुका आरोग्य अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येते. सदर माहिती शिक्षणाधिकारी यांच्याकडे देखील पाठविण्यात येते. तरी देखील अंगणवाड्यांमधील एकूण ७०,४४० मुले तपासण्यात आली असताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) व तालुक्याचे बाल विकास प्रकल्प अधिकारी (सी. डी. पी. ओ.) यांच्याकडे महिती उपलब्ध नसणे ही बाब समितीस अनाकलनीय वाटते त्यामुळे समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाद्वारे शालेय विद्यार्थ्यांची तपासणी केली जाते यासंदर्भात शासनाने काही मार्गदर्शक सूचना (गाईड लाईन्स) निर्गमित केलेल्या असतांना त्याच्या अंमलबजाणीच्या संदर्भात भंडारा जिल्हा परिषदे मधील व पंचायत समित्यां-मधील संबंधित अधिका-यांना प्राथमिक माहिती देखील असू नये ही बाब अत्यंत गंभीर आहे. सदर कार्यक्रम अनेक वर्षापासून राबविण्यात येत असतानाही त्याबाबत अनमिश असणे, जाणीवपूर्वक या कार्यक्रमांकडे दुर्लक्ष करणे,जबाबदारी ढकलणे,समन्वयाचा अभाव असणे ही बाब निश्चितच चिंताजनक असून संबंधित अधिका-यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक १ ऑगस्ट २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, भंडारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोदंले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(३) श्री. हरिष तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**जिल्हा परिषद पदाधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा :**

१. श्री. रमेश डोंगरे, अध्यक्ष

२. श्री. विवेकानंद कुर्सेकर, उपाध्यक्ष

३. श्री. प्रेमदास वनवे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती

४. श्री. धनेंद्र तुरकर, सभापती, शिक्षण व अर्थ समिती

५. श्रीमती विशाखा बांडेबुचे, सभापती, पंचायत समिती, मोहाडी

६. श्रीमती रोशना नारनवरे, सभापती, पंचायत समिती, तुमसर

७. श्रीमती उषा डोंगरवार, सभापती, पंचायत समिती, साकोली

८. श्रीमती मंगला प्रदिप बगमारे, सभापती, पंचायत समिती, लाखांदूर

९. श्रीमती रेखा ठाकरे, सभापती, महिला व बालकल्याण समिती

१०. श्रीमती रेखा वाजबिड, सभापती समाजकल्याण समिती

**ग्रामविकास विभाग :**

(१) श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

(२) श्री. अरुणकुमार पवार, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग**

श्री. अनिल किटे, सह आयुक्त (तपासणी), आयुक्त कार्यालय, नागपूर

**जिल्हा परिषद, भंडारा**

१. श्री. रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी

२. श्री. अ. बा. मानकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

३. श्रीमती मंजुषा ठवकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

४. श्रीमती मनिषा कुरसंगे, महिला व बालविकास अधिकारी तथा प्रकल्प संचालक

५. डॉ. कमलेश भंडारी, जिल्हा आरोग्य अधिकारी

६. श्री. एल.एस. पाच्छापुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

७. श्री. डी.पी. सपाटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

८. श्री. स.नु. यादव, कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग

९. श्री. म. पी. मुकटे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

१०. श्री. प्र. वा. कोल्हे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

११. श्री. व्ही. के. झिंगरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

१२. डॉ. एन. एच. फुके, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

१३. श्री. मो. भी. मैदमवार , कार्यकारी अभियंता, ग्रापापु विभाग

१४. श्री. आ. एम. दिघे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मग्रारोहयो

१५. श्री. एम. जी. डाबरे, कृषि विकास अधिकारी

१६. श्री. रविंद्र कारोलकर, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण)

१७. श्रीमती नुतन सावंत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती,भंडारा

१८. श्रीमती अनिता तेलंग, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी

१९. श्री. के. के. ब्राम्हणकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लाखनी

२०. श्री. सुनिल तडस, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साकोली

२१. श्री. देविदास देवरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लाखांदूर

२२. श्री. प्रकाश निर्वाण, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

२३. श्री. रविंद्र वंजारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील भंडारा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

(शा.म.मु.)एचबी २४३६—६-४५०-

**गुरुवार, दिनांक २ ऑगस्ट २०१८**

**स्थळः जिल्हा परिषद सभागृह, भंडारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(७) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(८) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(११) श्री . विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य** :

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. हरिष तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग :**

(१) श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग मंत्रालय

(२) श्री. अरूण कुमार पवार, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग मंत्रालय

**जिल्हा परिषद,भंडारा :**

(१) श्री. रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकरी

(२) श्री.अ.बा.मानकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) श्रीमती मंजुषा ठवकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्रीमती मनिषा कुरसंगे, महिला व बालविकास अधिकारी तथा प्रकल्प संचालक

(५) डॉ.कमलेश भंडारी, जिल्हा आरोग्य अधिकारी

(६) श्री.एल.एस. पाच्छापुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(७) श्री. डी. पी. सपाटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. स. नु. यादव, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(९) श्री. ए. पी. मुकटे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१०) श्री. प्र. वा. कोल्हे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(११) श्री. व्ही. के. झिंगरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१२) डॉ. एन. एच. फुके, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१३) श्री. मो. भी. मैदमवार, कार्यकारी अभियंता, ग्रापापु विभाग

(१४) श्री. आ. एम. दिघे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मग्रारोहयो

(१५) श्री. एम. जी. डाबरे, कृषि विकास अधिकारी

(१६) श्री. रविंद्र कारोलकर, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण)

(१७) श्रीमती नुतन सावंत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भंडारा

(१८) श्रीमती अनिता तेलंग, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी

(१९) श्री. के. के. ब्राम्हणकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लाखनी

(२०) श्री. सुनिल तडस, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साकोली

(२१) श्री. देविदास देवरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लाखांदूर

(२२) श्री. प्रकाश निर्वाण, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

(२३) श्री. रविंद्र वंजारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गट विकास अधिकारी यांची सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात भंडारा जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०१८**

**स्थळः जिल्हा परिषद, भंडारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(८) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(९) श्री. राहूल बोंद्रे, वि.स.स.

(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(११) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१२) श्री . विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

श्री. हरिष तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग :**

(१) श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

(२) श्री. अरूण कुमार पवार, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

**जिल्हा परिषद, भंडारा :**

(१) श्री. रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री अ. बा. मानकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) श्रीमती मंजुषा ठवकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्रीमती मनिषा कुरसंगे, महिला व बालविकास अधिकारी तथा प्रकल्प संचालक

(५) डॉ. कमलेश भंडारी, जिल्हा आरोग्य अधिकारी

(६) श्री. एल. एस. पाच्छापुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(७) श्री. डी. पी. सपाटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. स. नु. यादव, कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग

(९) श्री. ए. पी. मुकटे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१०) श्री. प्र. वा. कोल्हे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(११) श्री.व्ही.के. झिंगरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१२) डॉ. एन.एच.फुके, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१३) श्री.मो.भी.मैदमवार, कार्यकारी अभियंता, ग्रापापु विभाग

(१४) श्री. आ.एम.दिघे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मग्रारोहयो

(१५) श्री. एम.जी.डाबरे, कृषि विकास अधिकारी

(१६) श्री. रविंद्र कारोलकर, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण)

(१७) श्रीमती नुतन सावंत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भंडारा

(१८) श्रीमती अनिता तेलंग, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी

(१९) श्री. के.के.ब्राम्हणकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लाखनी

(२०) श्री. सुनिल तडस, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साकोली

(२१) श्री. देविदास देवरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लाखांदूर

(२२) श्री. प्रकाश निर्वाण, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

(२३) श्री. रविंद्र वंजारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गट विकास अधिकारी यांची सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील भंडारा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ११ जून २०१९**

**स्थळ : जिल्हा परिषद, भंडारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(६) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई,**

श्री. सुनिल भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

(२) डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(३) श्रीमती विनीता सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग

(४) सुवर्णा खरात, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग

(५) श्री. संतोष कुमार, व्य.सं.म.ल.ड. महामंडळ

(६) श्री. म. र. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(७) श्री. कि. शां. परब, उप सचिव, जलसंपदा विभाग

(८) डॉ. विजय मुंदेवाड, सहसंचालक, आरोग्यसेवा

(९) श्री. राजाराम माने, विभागीय आयुक्त, नाशिक

(१०) श्री. यु. श्रीरंगम, सचिव तथा मु.का.अ.महा इमारत व इतर बांधकाम मुंबई

(११) श्री. विजयकांत पानबुडे, अपर कामगार आयुक्त, नागपूर

(१२) श्री. पुंडलिक मिराशे, सह सचिव (तांत्रिक) म.प्र.नि.मंडळ

(१३) श्री. विजय कुमार कलवले, सहा.संचालक मृद व जलसंधारण

(१४) श्री. श. मा. साठे, उप सचिव कामगार विभाग

(१५) डॉ. प्रशांत उईके, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१६) श्री. रमेश चव्हाण, उप सचिव, महसूल विभाग

**जिल्हा परिषद, भंडारा :**

(१) श्री. रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अ.बा.मानकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) श्रीमती मंजुषा ठवकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री.एल एस. पाच्छापुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(५) डॉ. प्रशांत ऊईके, जिल्हा आरोग्य अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत :**

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सचिव, जलसंपदा विभाग, सहसचिव, महिला व बालविकास विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, भंडारा यांची साक्ष घेतली.

## बैठकीचे कार्यवृत्त

पंचायत राज समिती (Panchayati Raj Samiti) ची बैठक बुधवार, दिनांक ०३ मार्च २०२१ रोजी ०३:०० वाजता, विसावा मजला, कक्ष क्र. २००१, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(४) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(६) श्री. माधवराव जवळगावकर पाटील, वि.स.स.

(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(९) श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, वि.स.स.

(१०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी.

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने बैठकीत दुस-या अहवालाच्या प्रारूपावर विचार करून किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.